रायगड, नवी मुंबई
वर्ष १६ ◆ अंक ३१३
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, ३१ मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण; गुन्हा दाखल/२
कॉरिडॉर प्रकल्पबाधितांना योग्य मोबदला देण्यात यावा/५
लाठी खेळात अलिबागच्या खेळाडूंनी जिंकली ३१ पदके/८

## राहुल गांधींना पुणे न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश



**पुणे :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पुढील तारखेला पुणे न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अक्षी जैन यांनी गुरुवारी (दि. ३०) दिले. राहुल यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत सात्यकी सावरकर यांच्या तक्रारीत आढळलेले तथ्य आणि विश्रामबाग पोलिसांचा तपासणी अहवाल प्रथमदर्शनी ग्राह्य धरीत न्यायालयाने हा आदेश दिला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल राहुल गांधी यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी सावरकरांचे नातू सात्यकी यांनी दाखल केलेल्या दाव्यात विश्रामबाग पोलिसांनी नुकताच तपासणी अहवाल न्यायालयात सादर केला. या अहवालाच्या आधारे राहुल यांना नोटीस बजावली जाणार असून त्यानुसार पुढील तारखेला पुणे न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जितेंद्र आव्हाडांचा तीव्र निषेध
## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अवमानावरून सर्वत्र संताप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाडच्या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला. त्यामुळे आव्हाड यांचा सर्वत्र निषेध होत आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि. ३०) आव्हाडांविरोधात पनवेलमध्येही जोरदार आंदोलन करण्यात आले. या वेळी आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.




या आंदोलनात भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, कामगार नेते जितेंद्र घरत, अनुसूचित जाती मोर्चाचे अरुण सोळंकी, विनायक मुंबईकर, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अविनाश गायकवाड, अनंता गायकवाड, श्याम साळवी, मयूर कदम, रावसाहेब खरात, मधुकर उरणकर, अमोल जाधव, कोषाध्यक्ष शोभा मिठबावकर, चित्रा भंडारी, सदस्य संजय कांबळे, आनंद जाधव, संतोष म्हस्के, चंद्रकांत सोनवणे, सुरजित टाक, सर्जेराव साळवे, गोपाळ पडे, अनंता वाहुळकर, उमेश कांबळे, आत्राम, गणेश जाधव, देवद ग्रामपंचायतीचे सदस्य बंटी रसाळ, श्री. ढवळे, श्री. तायडे, विष्णू गायकवाड, चेतन कांबळे यांच्यासह भीम अनुयायी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या महाड येथील आंदोलनादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला. महाडच्या आंदोलनावेळी आव्हाड व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मनुस्मृती असे लिहिलेले फोटो आणले होते. मनुस्मृती फाडण्याचे आंदोलन करीत असताना आव्हाड व त्यांच्या कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकरांचे फोटो फाडले. त्यामुळे भीम अनुयायांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. त्या अनुषंगाने आव्हाड यांच्या विरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात तसेच पुण्यातील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल दाखल झाला आहे.

स्टंटबाजीच्या नादात आव्हाडांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडून त्यांचा अपमान केला आहे. त्यामुळे आव्हाड यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी पनवेल येथील निषेध आंदोलनातून करण्यात आली.

## बाबासाहेबांचा अपमान महाराष्ट्र सहन करणार नाही -उपमुख्यमंत्री फडणवीस

**वाराणसी : वृत्तसंस्था**

शैक्षणिक अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक समाविष्ट केले जातील असा आरोप करून महाड येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महाडच्या चवदार तळ्यावर आंदोलन केले. या वेळी त्यांच्याकडून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला गेला. त्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. भाजपने या कृतीविरोधात राज्यभरात आंदोलन केले. या सगळ्याबाबत भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.

वाराणसी दौऱ्यावर गेलेले उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी तेथे पत्रकारांशी बोलताना म्हटले की, मनुस्मृतीतला एकही श्लोक कुठल्याही अभ्यासक्रमात घेण्याचा विचारही महाराष्ट्र सरकारतर्फे करण्यात आलेला नाही. आजच नाही, कधीही आलेला नाही. त्या संदर्भात कुठलीही चर्चा नाही. त्यामुळे तो काही प्रश्नच नाही. आमचे विरोधक रोज खोटे बोलतात आणि त्यासाठी मुद्दा शोधून काढतात. ज्यांनी चर्चा सुरू केली त्यांनीच आंदोलन सुरू केले. ते आंदोलन कसे खोटे होते हे आपण पाहिले. आंदोलन करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो त्यांनी (जितेंद्र आव्हाड) फाडला. महाराष्ट्र हे कधीही सहन करणार नाही.

# मान्सून केरळमध्ये दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केरळ आणि उत्तर-पूर्व भारतात मान्सून दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. पुढील दहा दिवसांमध्ये मान्सून महाराष्ट्रात येणार असल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे.



गेल्या काही दिवसांपासून मान्सून कधीपासून सुरू होईल याची वाट देशभरातील शेतकऱ्यांसह नागरिक पाहत होते. गेल्या वर्षी मान्सून उशिरा सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यंदाही पाऊस वेळेत सुरू होईल की नाही यावरून शेतकरी चिंतेत होते. देशातील तापमानातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. दिल्लीत तापमानाने रेकॉर्ड मोडला. अखेर हवामान विभागाने गुरुवारी (दि. ३०) मोठी अपडेट दिली.

नैऋत्य मोसमी पावसाने केरळ आणि ईशान्य भारताच्या बहुतांश भागांमध्ये प्रवेश केला आहे. कोकणातही हलक्या सरी कोसळण्याची शक्यता असल्याचे विभागाने म्हटले आहे.

सर्वसाधारणपणे दरवर्षी मान्सून १ जून रोजी केरळमध्ये दाखल होतो. या वर्षी मान्सून ३१ मे रोजी केरळात येईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता, पण एक दिवस आधीच म्हणजे ३० मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला असून पुढच्या प्रवासात असल्याचेही दिसत आहे. त्यामुळे मान्सूनच्या आनंदसरी १० जूनपर्यंत महाराष्ट्रात दाखल होऊन राज्यातील नागरिक सुखावतील अशी आशा आहे.

## जया शेट्टी खून; छोटा राजन दोषी

**मुंबई : प्रतिनिधी**

हॉटेल व्यावसायिक जया शेट्टी हत्येप्रकरणी कुख्यात गुंड छोटा राजनला जन्मठेप आणि १० लाखांचा दंड अशी शिक्षा मुंबई सत्र न्यायालयातील विशेष सीबीआय कोर्टाचे न्यायाधीश ए.एम. पाटील यांनी सुनावली. पत्रकार जे.डे. हत्याकांड प्रकरणानंतर छोटा राजनला सीबीआय कोर्टाने सुनावलेली ही दुसरी जन्मठेपेची शिक्षा आहे.

छोटा राजन टोळीने हॉटेल व्यावसायिक जया शेट्टी यांच्याकडे खंडणीची मागणी केली होती. खंडणी देण्यास नकार दिल्यानंतर छोटा राजनच्या गुंडांनी जुलै २००१मध्ये शेट्टी यांची गोळ्या झाडून हत्या केली होती.

## रक्त नमुना फेरफारप्रकरणी आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहरातील कल्याणीनगर पोर्शे कार अपघातप्रकरणी अल्पवयीन मुलाच्या रक्त नमुना अहवालात फेरफार करणारे ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांच्या पोलीस कोठडीत आणखी सात दिवसांची वाढ करण्यात आली आहे. या तिघांना गुरुवारी (दि. ३०) न्यायालयात हजर केले असता ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.




अपघातानंतर रक्त नमुना फेरफार प्रकरणात तपास अधिकाऱ्यांनी ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि शिपायास २७ जूनला अटक केली होती. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर केले असता सुरुवातीला चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. आता त्यांच्या पोलीस कोठडीत आणखी सात दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपीच्या आईचे रक्त हे मूळ नमुना बदलण्यासाठी घेतले होते का याची आता चौकशी सुरू आहे.

## निवडक

### जम्मूमध्ये बस दरीत कोसळून २१ जणांचा मृत्यू

**श्रीनगर :** जम्मूच्या अखनूर भागातील पुंछ महामार्गावर देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची बस १५० फूट कोसळल्याची घटना घडली आहे. या अपघातात २१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. ही बस हरियाणातील कुरूक्षेत्र भागातून शिवखोरी येथे यात्रेकरूंना घेऊन जात होती. अपघातानंतर पोलीस आणि स्थानिक लोकांनी बचावकार्य सुरू केले असून जखमींना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### राज्यसेवा पूर्वपरीक्षा आता ६ जुलैऐवजी २१ जुलैला

**मुंबई :** राज्यसेवा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक मोठी बातमी आहे. ६ जून रोजी होणारी राज्यसेवा परीक्षा आता २१ जुलै रोजी घेण्यात येणार आहे. ज्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या कुणबी अशा नोंदी सापडल्या आहेत त्यांना ओबीसी प्रवर्गातून अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या तारखेमध्येही बदल करण्यात आला आहे. या संबंधित निवेदन राज्यसेवा आयोगाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## सरकार स्थापन होताच २५ दिवस खास तरुणांसाठी -पंतप्रधान मोदी

**होशियारपूर : वृत्तसंस्था**

सरकार स्थापन होताच तिसऱ्या टर्ममध्ये पुढील १२५ दिवसांत काय होणार, सरकार काय करणार, कसे करणार, कुणासाठी करणार आणि कधीपर्यंत करणार याचा रोड मॅप तयार करण्यात आला आहे. यातही २५ दिवस विशेषतः तरुणांसाठी केंद्रित करण्यात आले आहेत, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. ते पंजाबमधील होशियारपूर येथे गुरुवारी (दि. ३०) लोकसभा निवडणूक २०२४च्या शेवटच्या टप्प्यातील सभेला संबोधित करीत होते.



या निवडणुकीच्या धावपळीतही आपल्या सरकारने एक क्षणही वाया घालवला नाही. पुढील पाच वर्षांत कोणते मोठे निर्णय घ्यायचे याबाबतची रूपरेषाही तयार करण्यात आली आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

या वेळी पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर हल्लाबोल केला. काँग्रेस भ्रष्टाचाराची जननी आहे. गेल्या ६० वर्षांत काँग्रेसने जे कारनामे केले आहेत ते पाहून त्यांनी भ्रष्टाचारात डबल पीएचडी केल्यासारखे वाटते. काँग्रेससोबत आणखी एक कट्टर भ्रष्टाचारी पक्ष जोडला गेला आहे. ते येथे एकमेकांच्या विरोधात लढण्याचे नाटक करीत आहेत. दिल्लीत सोबत निवडणूक लढत होते, अशा शब्दांत पीएम मोदींनी काँग्रेस व आम आदमी पक्षावर निशाणा साधला. ते पुढे म्हणाले, काँग्रेसच्या कुशीतून हे कट्टर भ्रष्टाचारी जन्माला आले आहेत. पंजाब नशामुक्त करू, असे म्हणत होते, मात्र त्यांनी नशेलाच कमाईचे साधन बनवले. दिल्लीतील दारू घोटाळा सर्वांना माहीत झाला आहे. आज संपूर्ण जग दिल्लीपासून पंजाबपर्यंत त्यांचे कारनामे बघत आहे.

महाराष्ट्र शासन



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
(३१ मे १७२५-१३ ऑगस्ट १७९५)
राजमाता
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
यांना त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त
विनम्र अभिवादन!
www.mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

# रायगड क्रिकेट असोसिएशन अध्यक्षपदी अनिरूद्ध पाटील



**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची पंचवार्षिक निवडणूक पेण येथील शिक्षक पतपेढीच्या सभागृहात झाली. या वेळी असोसिएशनच्या अध्यक्षपदी अनिरूद्ध रविशेठ पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे कार्याध्यक्षपदी चंद्रकांत मते आणि सेक्रेटरी म्हणून प्रदीप नाईक यांचीही बिनविरोध निवड झाली.

या बैठकीस असोसिएशनचे कौस्तुभ जोशी, जयंत नाईक, समीर मसुरकर, पंकज पंडित, संतोष भोईर, राजेश पाटील, सतीश पाटील, बशीर चिचकर, किरीट पाटील, सुनील घरत, यशवंत साबळे, संदीप पाटील, गणेश कडू, प्रशांत ओक आदी उपस्थित होते.

या वेळी निवडणूक प्रक्रियेमध्ये सभेचे अध्यक्ष प्रकाश शिंगरूत, तर निवडणूक अधिकारी म्हणून संजय तावडे, अरुण शिंदे यांनी काम पाहिले. सेक्रेटरी म्हणून प्रशांत ओक यांनी नियोजन केले होते. निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात क्रिकेट असोसिएशनचे सदस्य, विविध क्लबचे प्रतिनिधी उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया बिनविरोध झाली.

अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर अनिरूद्ध पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी माझी बिनविरोध निवड केल्याबद्दल मी सर्व सदस्यांचे व क्रिकेटप्रेमींचे मनःपूर्वक आभार मानतो. रायगड जिल्हा क्रिकेटमध्ये क्रांतिकारक बदल घडवून जिल्ह्यातील क्रिकेटचा स्तर मुंबई, पुण्याच्या बरोबरीने नेण्याचा माझा मानस आहे. याकरिता मला आपल्या सहकार्याची गरज आहे. असोसिएशनचा कारभार हा पारदर्शक, स्वच्छ व सर्वांना सामावून घेणारा असेल. यामध्ये खेळाडूची निवड ही पूर्ण पारदर्शक व त्यांच्या कामगिरीवर होईल. नेट सिलेक्शन पद्धत बंद केली जाईल. (पान २ वर..)

# उरणमध्ये खुलेआम गुटखा, मावा विक्री

## संबंधित टपरीधारकांवर कारवाईची मागणी



**उरण : बातमीदार**

गुटखा, पान मसाला यासारख्या मानवी शरीरावर दुष्परिणाम करणाऱ्या अन्न पदार्थावर महाराष्ट्रात २०१२ साली गुटखा व पानमसाल्याच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली. या गोष्टीला तब्बल ११ वर्षांचा कालावधी लोटला आहे, मात्र अजूनही कित्येक ठिकाणी छुप्या पध्दतीने गुटखा, पान मसाला विक्री छुप्या पध्दतीने मोठया प्रमाणावर होत आहे. तर उरण तालुक्यातील ग्रामीण भागात गुटखा पान मसाला विक्री करणाऱ्या टपरीधारकांवर कारवाई होत नसल्याने बिंदास हे दुकानदार खुलेआम गुटखा पानमसाल्याची विक्री करत आहेत.

गुटखा पानमसाला यांच्या सेवनाने अबालवृद्धांवर होणारे परिणाम पाहता राज्यात २०१२ साली गुटखा बंदीचा कायदा लागू केला. कारण या गुटख्याच्या आधीन शाळकरी मुले व तरुण पिढी मोठ्या प्रमाणात होत होती. गुटखा बंदी कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यात गुटखा उत्पादन, गुटख्याची वाहतूक व विक्रीवर बंदी आणली. सुरुवातीला गुटखा बंदी कडक लादली गेली. मुंबई पासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या उरण तालुक्यात शहरी भाग असो किंवा ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री पाहायला मिळत आहे.

कारवाईच्या भीतीने शहरी भागात गुटखा, पान मसाला छुप्या पद्धतीने विकला जात आहे, मात्र उरणच्या ग्रामीण भागात पोलीस प्रशासन, अन्न नागरी औषध प्रशासन यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने खुलेआम गुटखा, व घातक असा पानमसाला विक्री होत आहे. खुलेआम विक्री होणाऱ्या गुटख्यावर पालिका, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन व अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा विक्रीला कायमची बंदी घालावी, अशी मागणी उरण परिसरातील नागरिकांकडून होत आहे. खुलेआम होणाऱ्या गुटखा पान मसाला विक्रीमुळे शाळेत शिकणारी अल्पवयीन मुले गुटखा व पानमसाल्या सारख्या तब्येतीला हानिकारक अशा पदार्थांचे व्यसन करीत आहेत. गुटखा खाल्ल्याने कित्येकांना तोंडाचा कॅन्सर झाला असून या व्यसनापायी नाहक बळी गेल्याची अनेक उदाहरणे समोर आहेत. उरणच्या ग्रामीण भागात गुटखा खरेदीसाठी कित्येक नागरिक शहरातून येत असतात. गुटख्याची विक्री करणारे होलसेल विक्रेते उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील छोट्या दुकानदारांना विक्रीसाठी खुलेआम माल पुरवित आहेत. अधिक पैसा मिळवण्याच्या लोभापाई हे टपरीधारक लोकांच्या जिवाशी गुटख्याची दामदुप्पट दराने विक्री करून खेळत आहेत.

अन्न औषध प्रशासन व पोलीस प्रशासन ग्रामीण भागात फिरकत नसल्याने ग्रामीण भागातील गुटखा पान मसाला विक्रेत्यांना रानच मोकळे झाले आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृतरित्या अनेक पानपट्टयावर दुकानात गुटखा पान मसाल्याची विक्री खुलेआम होताना पाहायला मिळत आहे.

**महाराष्ट्र राज्यात गुटखा विक्री करण्यास बंदी आहे. त्यामुळे छुप्या व खुलेआम पध्दतीने गुटखा विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कडक कारवाई करण्यात येईल. शहरी भाग असो किंवा ग्रामीण भागात असो कुणी चुकीचे कृत्य करत असेल तर त्यांच्यावर कारवाई होणारच.**

**–मारुती घोळसवाड,**
**सहाय्यक आयुक्त,**
**अन्न औषध नागरिक प्रशासन**

# खारघरमध्ये भाजपकडून जितेंद्र आव्हाडांचा जाहीर निषेध

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मनुस्मृती दहन करण्याच्या नादात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फाडल्याने खारघर भाजप कार्यकर्ते व आंबेडकरी जनतेत संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ खारघर शहरातील नवरंग चौकात भाजपतर्फे जितेंद्र आव्हाडांचा निषेध करण्यात आला.

भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर अध्यक्ष संदीप माघाडे यांच्या नेतृत्वाखाली खारघर भाजपचे अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, माजी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय लोखंडे, महिला मोर्चा सरचिटणीस कांचन बिर्ला, अंकिता वारंग, सीमा खडसे, निर्मला यादव, सुशीला शर्मा भाग्यश्री खरपूरीया, शकुंतला नेगी, रजनी शर्मा, गायत्री महापात्रा, दुर्गा बन्सल, शैलेंद्र त्रिपाठी, प्रवीण बेरा, केतन नवघरे, आदित्य हातगे, सचिन कटके, भागवत काका, अनिल खोपडे, म्हातारदेव खामकर, विठ्ठल घोलवे, प्रसाद पंडित, रवींद्र माने, दादाराव उगले, सीताराम जगताप, संदीप खरात, राहुल वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जितेंद्र आव्हाड यांच्या फोटोला जोडे मारून निषेध व्यक्त केला गेला.



# सीकेटी महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन सत्र

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात दहावी–बारावीच्या विद्यार्थी आणि पालकवर्गासाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षांद्वारे बँकिंग क्षेत्रात स्वतःचे करिअर घडवू पाहणाऱ्या रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन शुक्रवार, ७ जून २०२४ रोजी करण्यात आले आहे. या सत्रात सरकारी बँकिंग क्षेत्रातील करिअरची संधी या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सत्राचा लाभ जिल्ह्यातील दहावी बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे. BANK/SBI/RBI/Railway/ LIC/ NABARD या सारख्या सरकारी कंपन्यांमध्ये असणाऱ्या संधी आणि इतर स्पर्धापरीक्षांद्वारे करिअर घडवू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे एक महत्त्वाचे सत्र ठरणार आहे.

सकाळी ११ वाजता सीकेटी महाविद्यालयातील ११८ सभागृहात होणाऱ्या या सत्राचा लाभ घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक आणि या कार्यक्रमाचे आयोजक विजयेंद्र शिताळे यांनी केले आहे. नाव नोंदणी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSeqXP-Ey9PilBl1z0hyGSzjg00nGrIfYTzwuYhcR8F8BGxzy-/viewform?usp=sfšlink या लिंकवर जाणून करावी तसेच अधिक माहितीसाठी ९८३३१७७५५१ अथवा ९२२३५५५७७९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सीकेटी महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# जितेंद्र आव्हाड यांच्यावर कठोर कारवाई करावी –अमित जाधव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडून अपमान करणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांनी केली आहे.



जितेंद्र आव्हाड यांनी महाड येथील आंदोलनादरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला. त्यामुळे आव्हाड यांचा सर्वत्र निषेध होत आहे. आव्हाडांनी डॉ. आंबेडकरांचा फोटो फाडून त्यांचा अपमान केला आहे. त्यांच्या या कृत्याचा मी तीव्र निषेध करीत असून त्यांच्यावर पोलिसांनी कडक कारवाई करावी, म्हणजे पुन्हा असे काही करण्यास ते चुकूनही धजावणार नाहीत, असे अमित जाधव यांनी म्हटले आहे.

आधी स्टंटबाजी करायची आणि नंतर माफी मागायची ही जितेंद्र आव्हाड यांची जुनीच खोड आहे. आता त्यांनी भारताची राज्यघटना लिहिणाऱ्या महापुरुषाचा अवमान केला आहे. त्यामुळे आव्हाड यांना माफी न देता कडक शासन व्हावे, असेही जाधव म्हणाले.

# पनवेल महापालिकेतर्फे पीसीपीएनडीटी आणि एमटीपी कायद्याविषयी जनजागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत गर्भधारणा व प्रसूतीपूर्व निदान तंत्र लिंग निवड प्रतिबंध कायदा १९९४ (पीसीपीएनडीटी ॲक्ट) व वैद्यकिय गर्भपात कायदा (एमटीपी ॲक्ट) कायद्याबाबत संवेदीकरण करण्याच्यादृष्टीने तसेच माता मृत्यू व बालमृत्यू टाळण्याकरिता करण्यात येणाऱ्या उपाययोजना याबाबत महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल येथे गुरुवारी (दि. ३०) करण्यात आले.

या कार्यशाळेत पीसीपीएपडीटी कायद्याबाबतच्या तरतूदी, त्यातील बदल याबाबत विधी सल्लागार ॲड. अर्चना शेगावकर व एमटीपी कायद्याबाबत डॉ. संतोष जायभाये यांनी मार्गदर्शन केले. मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. गिरीश गुणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, डॉ. माया काळे डॉ.वाळके, सर्व वैद्यकिय अधिकारी, महापालिका कार्यक्षेत्रातील सोनोग्राफी सेंटर्सचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना विधी सल्लागार ॲड. अर्चना शेगावकर यांनी गर्भधारणा व प्रसूतीपूर्व निदान तंत्र लिंग निवड प्रतिबंध कायदा १९९४ या कायद्याची उदिष्टे, या कायद्यांतर्गत रजिस्ट्रेशन, सोनोग्राफी केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक ट्रेनिंग, सोनोग्राफी मशीन निर्लेखन, केंद्रामधील आवश्यक सूचना फलक, रुग्णाचे रेकॉर्ड, अल्ट्रा सांऊड मशीनची खरेदी व विक्री, पोर्टेबल मशीनची माहिती, पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत मिळणारी शिक्षा या संबधी माहिती दिली.

डॉ. संतोष जायभाये यांनी वैद्यकिय गर्भपात कायदा २०२१ची वैशिष्ट्ये, सुरक्षित गर्भपाताचे निकष, या कायद्यांतील पूर्वीच्या तरतूदी व २०२१ मध्ये बदलेल्या तरतूदी, गोपनीयता व सुरक्षितता अशा विविध घटकाची माहिती दिली तसेच उपस्थितींच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

या वेळी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी म्हणाले, आयुक्त महोदयांच्या प्रेरणेने महापालिका कार्यक्षेत्रात शून्य माता मृत्यू व शून्य बाल मृत्यूचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. यासाठी खासगी रुग्णालयांनी महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले तसेच खासगी रूग्णालातील पीसीपीएनडीटी केंद्रे व एमटीपी केंद्रे यांनी 'बेटी बचाओ' या आंदोलनात सहभागी होऊन मदत करावी. स्त्री भ्रूण हत्या संदर्भात जन जागृतीमध्ये करावी, असे आवाहन डॉ. गोसावी यांनी केले.

डॉ. गिरीश गुणे यांनी पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्यासाठी उपस्थित रुग्णालयाच्या संचालकांना मदतीचे आवाहन केले. तसेच मातामृत्यू व बालमृत्यू कमी करण्यासाठी प्रशासनासोबत एकत्रित उपाययोजना राबविण्यास सहकार्य करावे, असे सांगितले. या वेळी महापालिका कार्यक्षेत्रातील विविध रुग्णालयातील सोनोग्राफी केंद्रे व खासगी सोनेग्राफी केंद्रांच्या प्रतिनीधींनी त्यांच्या विविध शंकाचे निरसन केले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळ व आम्ही रक्तदाते पनवेलचे यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.


पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तथा पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या नियोजनातून होणारे हे शिबिर २ जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ पर्यंत सीकेटी विद्यालयात होणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याने या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दरम्यान, या शिबिरासाठी खारघरमधील टाटा मेमोरियल सेंटर यांचे सहकार्य लाभणार आहे.



**पनवेल : खानाव ग्रुप ग्रामपचांयतीच्या सरपंचपदी महाळुंगी येथील निलम मनोहर अरिवले यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, खानावचे उपसरपंच बाळाराम पाटील, बूथ अध्यक्ष मनोहर अरिवले आदी उपस्थित होते.**

# जेएनपीएचा ३५वा वर्धापन दिन उत्साहात

**उरण : प्रतिनिधी,**
**वार्ताहर, बातमीदार**




देशातील पहिल्या क्रमांकाचे बंदर म्हणून ख्याती असलेल्या व १०० टक्के जमीनदार आणि प्रमुख कंटेनर बंदर जेएनपीए प्रशासनाने संपूर्ण देशातील प्रसिद्ध असलेल्या कुलाबा मुंबई येथील हॉटेल ताजमहाल, येथे आयोजित करण्यात आलेल्या ३५व्या वर्धापन दिन व वर्षांच्या ऑपरेशनल उत्कृष्टतेचे समृद्धी बंदर या थीमवर असलेल्या या कार्यक्रमात भारताच्या सागरी उद्योगातील महत्त्वाच्या भूमिकेला ओळखून जनेपप्राच्या उल्लेखनीय कामगिरी आणि वाढीचा उत्सव साजरा करण्यात आला.

जनेपप्रा भारताच्या बंदरातील कामकाजाचा कायापालट करण्यात सातत्याने आघाडीवर असून १९८९ मध्ये त्याची स्थापना झाल्यापासून, ते भारतातील सर्वांत मोठे कंटेनर बंदर बनले आहे. बंदराने अलीकडेच २०२३–२४ या आर्थिक वर्षात ६.४३ दशलक्ष टीयूएसची आतापर्यंतची सर्वोच्च थ्रूपुट नोंदवून ऐतिहासिक टप्पा गाठला. शिवाय जनेपप्राने गेल्या काही वर्षांत सातत्याने दरवर्षी ६ दशलक्ष टि यूएस कंटेनर हाताळले आहेत. डिजिटलायझेशन, ऑटोमेशन, वचनबद्धता आणि ग्रीन पोर्ट उपक्रमांमध्ये बंदराच्या धोरणात्मक पुढाकाराने उद्योगात नवीन बेंचमार्क स्थापित केले आहेत. जेएनपीएची शाश्वतता आणि सामुदायिक विकासासाठी वचनबद्धतादेखील त्याच्या यशामध्ये एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

सर्वसमावेशक वाढ आणि पर्यावरणीय कारभारीपणा सुनिश्चित करीत आहे. राष्ट्रगीत आणि राज्य गीताने कामकाजाला सुरुवात झाली, त्यानंतर दीपप्रज्वलन करून संध्याकाळचा पूजनीय स्वर लावण्यात आला. महाराष्ट्र राज्य विधानसभेचे राज्यपाल रमेश बैस यांनी मुख्य पोस्ट मास्टर जनरल यांच्या उपस्थितीत जनेपप्राचे विशेष कव्हर आणि कॉर्पोरेट कस्टमाइज्ड माय स्टॅम्प जारी करण्यासाठी केंद्रस्थानी घेतले. त्यानंतर जनेपप्रा कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले, हा बंदराचा समृद्ध इतिहास आणि टप्पे समाविष्ट करणारा एक स्मारक भाग आहे.

त्यानंतर भांडारकर प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या विशेष आवृत्तीच्या अंकाचे प्रकाशन केले. त्यानंतर, एका महत्त्वपूर्ण वाटचालीत, वाढवण येथील ग्रीनफील्ड बंदराच्या विकासासाठी जेएनपीए आणि पीएसए (भारत) आणि जेएनपीए आणि सिएमए सीजीएम यांच्यात एकूण ४० हजार रुपये कोटीच्या दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. यानंतर, राज्यपाल रमेश बैस यांच्या शुभहस्ते बंदराच्या यशात त्यांच्या योगदानाची दखल घेऊन पंचवीस जेएनपीए भागधारक आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. जनेपप्राच्या प्रभावी प्रवासाची ३५ वर्षे पूर्ण होत असताना, आम्ही भारताच्या सागरी पायाभूत सुविधांना पुढे नेण्याच्या आमच्या कामगिरीकडे वळून पाहतो. नवोन्मेष, कार्यक्षमता आणि टिकावासाठीच्या आमच्या समर्पणाने जेएनपीएला जागतिक बंदर ऑपरेशन्समध्ये एक नेता म्हणून स्थापित केले आहे.

हा टप्पा आमच्या कार्यसंघाची वचनबद्धता आणि आमच्या भागधारकांच्या पाठिंब्याला अधोरेखित करतो. याव्यतिरिक्त, राज्यपालांच्या विनंतीला प्रतिसाद देत, जेएनपीएने येत्या २ महिन्यांत ३८ एकलव्य मॉडेल शाळांना १हजार संगणक आणि १०० टॅब्लेटसह सुसज्ज करण्यासाठी आयएनआर ३.५ कोटी देण्याचे वचन दिले असल्याचेही जनेपप्राचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी या वेळी म्हटले आहे. पुढील वर्षी एप्रिलपर्यंत, बीएमटीसी टर्मिनलच्या जोडणीसह, जेएनपीएची क्षमता १०.४ दशलक्ष टियूईएस पर्यंत पोहचेल आणि भारतातील सर्वांत मोठे बंदर म्हणून त्याचे स्थान मजबूत होईल. त्याच प्रमाणे सहभागींना नेटवर्क करण्याची आणि समृद्ध भविष्याची सामूहिक दृष्टी साजरी करण्याची संधी देऊन कार्यक्रम संपले. जनेपप्रा पुढे पाहत असताना, ते अग्रगण्य प्रगती आणि राष्ट्रासाठी आर्थिक समृद्धी आणण्यासाठी समर्पित असल्याचे शेवटी वाघ यांनी अधोरेखित केले.

# उलवे नोडमध्ये सजावट रोपांची लागवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे सेक्टर २ येथे सिडकोने लावलेली झाडे सुकलेली होती. रहिवाश्यांच्या विनंतीवरून उज्ज्वल वेल्फेअर गटाने त्या ठिकाणी नवीन सजावटीच्या वनस्पती लावण्याचा निर्णय घेतला.

उज्ज्वल वेल्फेअरचे संस्थापक देवालय मित्रा यांनी रहिवाशांच्या सहकार्याने आणि नैतिक समर्थनाने अमर म्हात्रे, वीतेश म्हात्रे आणि देवी प्रसाद मित्रा ८२ सजावटीचे रोपे लावली. त्याचबरोबर पाच सोसायट्यांनी पाणी देण्याची जबाबदारी घेतली आहे.

जी मुले पर्यावरणाच्या कल्याणासाठी काम करतात त्यांना उज्ज्वल वेल्फेअर संस्थापक देवालय मित्रा आणि त्यांच्या टीमने आवाहन केले आहे की, पर्यावरणाच्या सुधारासाठी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊन एक उदाहरण घालून द्या.





## संपादकीय

# मान्सून आला खरा

देशाची राजधानी नवी दिल्लीत बुधवारी ५२.३ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदले गेल्यामुळे जागतिक तापमानवाढीचे दुष्परिणाम आणखी समीप आल्याची जाणीव गडद झाली होती, पण दुसऱ्याच दिवशी गुरूवारी केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची आनंदवार्ताही मिळाली. पाऊस सुरू झाल्याचा आनंद आहेच, पण उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटा आणि पाणीटंचाईचे विस्मरण होऊ देणे योग्य ठरणार नाही. हे प्रश्न आता प्रतिवर्षी अधिक दाहकतेने जाणवणार असल्याने त्यासंदर्भात दीर्घकालीन व व्यापक उपाययोजना आवश्यक बनली आहे.

**गेल्या आठवड्यापासून सूर्य दिल्लीवर आग ओकत असल्याचे आपण ऐकून होतोच. पण बुधवारी दिल्लीतील मुंगेशपूर परिसरात देशातील सर्वाधिक ५२.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आणि जागतिक तापमानवाढीमुळे नजिकच्या भविष्यात आपल्याला किती भीषण परिस्थितीला तोंड द्यावे लागू शकते याची जणु झलकच पहायला मिळाली. गेले अनेक दिवस उत्तर भारतात लोक उष्णतेची भीषण लाट अनुभवत आहेत. मे महिन्याची अखेर आणि जूनचा प्रारंभ या दरम्यानचा कालखंड या भागात 'नौतपा' या नावाने ओळखला जातो. या काळात सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो आणि तिथेच नऊ दिवस राहतो असे म्हणतात. यंदा २५ मेपासून सुरू झालेला नौतपा २ जून रोजी संपणार आहे. दरम्यान, देशाच्या वायव्येकडील भागात पुन्हा 'वेस्टर्न डिस्टर्बन्स'ची शक्यता असल्यामुळे हवामान विभागाने पंजाब, हरयाणा, दिल्ली, राजस्थान व उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये आणखी दोन दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दरम्यान, मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याची घोषणाही गुरुवारी हवामान विभागाने केल्याने सगळ्यांनाच हायसे वाटले आहे. ३१ मे रोजी मान्सून केरळात दाखल होईल असा अंदाज आधी वर्तविण्यात आला होता. मान्सून केरळच्या उंबरठ्यावर आल्यापासूनच मुंबई आणि आसपासच्या परिसरात उष्मा पुन्हा वाढल्याचे जाणवू लागले होते. सध्या या परिसरात आर्द्रतेत आणखी वाढ झाली आहे. आठवड्याच्या अखेरीस मराठवाडा, मध्य महाराष्ट्र तसेच विदर्भात वळवाच्या पावसाची चिन्हे आहेत. विदर्भात सध्या उष्णतेची लाट जाणवत असून नागपूर शहरात अलीकडेच चार जण रस्त्यावर मृतावस्थेत आढळून आले. त्यांचा मृत्यू उष्माघाताने झाला असावा असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याखेरीज यवतमाळ आणि बुलढाण्यातही तिघांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. उष्णतेच्या लाटेबरोबरच राज्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा अवघा २२ टक्के इतका उरल्यामुळे पाऊस कधी येतो याकडे सगळ्यांचेच डोळे लागले आहेत. यंदाच्या पाणीटंचाईमुळे राज्यभरात टँकरने होणारा पाणीपुरवठा वाढला आहे. राज्यातील एकूण २५ जिल्ह्यांमध्ये सध्या टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो आहे. देशपातळीवरही यंदा दिल्ली आणि बंगळुरूसारख्या दोन महानगरांमध्ये मोठी पाणीटंचाई जाणवल्याने वाढत्या शहरीकरणासोबत पाण्याचा प्रश्न कसा बिकट होईल त्याचे दर्शनच घडते आहे. यापूर्वी जून २०१९ मध्ये चेन्नईने भीषण पाणीटंचाईचा अनुभव घेतला होता. मोठ्या शहरांमध्ये प्रचंड प्रमाणात बांधकाम झाल्यामुळे उपलब्ध पाणीसाठा अपुरा पडू लागला आहे. सगळीकडे उंच टॉवर उभे राहात आहेत, पण वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा कसा करणार याचा पुरेसा विचार झालेला दिसत नाही. जागतिक तापमानवाढीमुळे दीर्घकाळ रेंगाळणाऱ्या उष्णतेच्या लाटा आणि पाणीटंचाई हे आता दर उन्हाळ्यातील प्रश्न होत जाणार याची कल्पना जाणकारांना आहेच. पाऊस सुरू झाल्यावर हे वास्तव विसरून चालणार नाही.**

# सर्वांनाच ४ जूनच्या निकालाची उत्सुकता





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड लोकसभा निवडणुक ७ मे रोजी झाली. मतदान झाल्यानंतर आता सर्वांनाच उत्सुकता लागली आहे ती निकालाची. मतांची माजणी ४ जून रोजी होणार आहे. मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला आहे ते त्या दिवशी स्पष्ट होईल. या मतदारसंघात महायतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे व महाविकास आघाडीचे उमेदावार माजी केंद्रीयमंत्री अनंत गीते यांच्या खरी लढत आहे. ही लढत चुरशीची झाली आहे. त्यामुळे दोन्ही बाजूने विजयाचा दावा केला जात आहे. कधी नव्हे ते यंदा या मतदारसंघात धार्मिक मतांचे ध्रुविकरण करण्यात आले आहे. या मतदारसंघात, कुणबी, आगरी व मुस्लीम मतदारांची संख्या जास्त आहे. इतर समाजाच्या तुलनेत कुणबी मतदार जास्त आहेत. त्यामुळे कुणबी मते ज्यांच्या पारड्यात पडली असतील तो उमेदवार विजयी होईल.

रायगड लोकसभा मतदारसंघात यंदा मतदानाच्या टक्केवारीत किंचीत घट झाली आहे. यंदा ६०.५१ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. २०१९ साली झालेल्या लोकसभा निवडणूमीत ६१.१७ टक्के मतदान झाले होते. यंदा १० लाख नऊ हजार ५६३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. येथे महाविकास आघाडीचे अनंत गीते व महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांची चुरशीची लढत आहे. त्यांच्या राजकीय प्रतिष्ठा व अस्तित्वाची ही निवडणूक आहे. दोन्ही बाजूंनी विजयाचा दावा केला जात आहे. आता विजयाचा गुलाल उधळण्याची कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे.

महिनाभर उमेदवारी अर्ज भरणे, मोठ्या सभा, चौकसभा, मेळावे, बूथची तयारी, व्होटर स्लीपा वितरीत करणे, घरोघरी प्रचार करणे या कामात गुंतले होते. आता जय पराजयाची गणिते जुळवली जात आहेत. त्यासाठी तालुकावार पदाधिकाऱ्यांना फोन करून मतांची आकडेवारी गोळा केली जात आहे. प्रत्येक बूथवर आपल्या उमेदवाराला किती मते पडतील याचा अंदाज बांधला जात आहे. कार्यकर्ते, पदाधिकारी मताधिक्क्याची भाषा करीत आहेत. काही ठिकाणी मतदारांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने कार्यकर्ते नाराजीची भावना व्यक्त करीत आहेत.

निवडणूकीची मदार कार्यकर्त्यांवर असते. त्यामुळेच प्रत्येक नेता कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार करतो. निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून उमेदवारांनी व पदाधिकाऱ्यांनी प्रचाराचे नियोजन केले होते. त्यामध्ये कार्यकर्त्यांना अग्रस्थान होते प्रचार फेऱ्या, बैठका, पत्रके वाटणे, मतदारांच्या गाठीभेटी घेणे, छुपा प्रचार करणे या कामांत कार्यकर्ते व्यग्र होते. प्रमुख कार्यकर्त्यांची तर दमछाक झाली. त्यामुळे मतदान झाल्यानंतर त्यांनी निःश्वास टाकला आहे. आता त्यांचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व गुहागर अशा सहा विधानसभा मतदारसंघांचा रायगड लोकसभा मतदारासंघात समावेश आहे. सर्वाधिक मतदान अलिबाग मतदारसंघात ६६.६७ टक्के झाले आहे. पेणमध्ये ६४.५१ टक्के मतदारांनी मतदान केले. महाड, दापोली, श्रीवर्धन, गुहागर या चार विधानसभा मतदारसंघांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले आहे. या वेळी मुंबई स्थित मतदार आणण्यात राजकीय पक्षांनी रस दाखवला नाही. काही प्रमाणात मतदार आणले. जे संशयास्पद मतदार होते त्यांना आणण्याचा धोका कुणी स्वीकारला नाही. उन्हाचा वाढता तडाखा, बदलत्या राजकीय परिस्थिती, मागील चार वर्षांतील राजकीय घडामोडी यामुळे मतदारांमध्ये निरुत्साह होता. ही मतदान कमी होण्याची कारणे आहेत.

**रायगड लोसभा मतदारसंघात झालेले विधानसभानिहाय मतदान**

| मतदारसंघ | झालेले मतदान |
|---|---|
| पेण | १,९५,६५३ |
| अलिबाग | १,९८,२८५ |
| श्रीवर्धन | १,५५,२५४ |
| महाड | १,६३,६९६ |
| दोपली | १,६०,७९८ |
| गुहागर | १,३५,८७७ |
| एकूण | १०,०९,५६० |

रायगड लोकसभा मतदारसंघा १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार आहेत. यात यामध्ये आठ लाख २० हजार ६०५ पुरुष मतदारांचा तर आठ लाख ४७ हजार ७६३ महिला मतदारांचा समावेश आहे. यापैकी १० लाख नऊ हजार ५६३ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. पाच लाख ३३३ पुरूष तर पाच लाख नऊ हजार २३० महिला मतदारांनी मतदान केले.

रायगड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने शिवसेनेच अनंत गीते यांची उमेदवारी तशी लवकर जाहीर केली होती. महायुतीचा उमेदवार ठरवण्यात उशीर झला. लवकर उमेदवारी जाहीर केल्यामुळे गीतेंना प्रचारसाठी भरपूर वेळ मिळाला. सुरूवातीला त्यांनी प्रचारात आघाडी घेतली होती. उशीरा उमेदवारी जाहीर झाली असली तरी सुनील तटकरे यांनी महायुतीच्या नेत्यांना सोबत घेऊन मतदारसघ पिंजून काढला. या मतदारसंघात कधी न्रेव्हे तो यंदा जातीय व धार्मिक मतांच्या ध्रुविकरणाचा परिणाम झाला. या मतादारसंघात कुणबी, आगारी व मुस्लीम मतदारांची संख्या जास्त आहे. गुहागर, दापोली, श्रीवर्धन या मतादासंघात कूणबी मतरांची संख्या सर्वांत जास्त आहे. तसे महाड, श्रीर्धन, अलिबाग या मतदारसंघात मुस्लीम मतदारांची संख्या बऱ्यापैकी आहे. अलिबाग, पेण या मतदारसंघात आगरी मतदार आहेत. ही मत निर्णक ठरणार आहेत. कुणबी मत एकगठ्ठा ज्या उमेदवाराच्या पारड्यात पडतील तो उमेदवार विजयी होईल.

# आज जागतिक तंबाखूविरोधी दिन

दरवर्षी ३१ मे रोजी तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याची गरज भासू लागली, या दिवसाचे महत्त्व काय आहे हे जाणून घेऊयात.

तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या हानीबाबत लोकांना जागरुक करण्याच्या उद्देशाने जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी जगभरात साजरा केला जातो. तंबाखू निषेध दिन केव्हा आणि का साजरा करण्याची गरज भासू लागली, या दिवसाचे महत्त्व जाणून घेऊयात...

खरे तर तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने १९८७ मध्ये तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. पुढच्या वर्षी म्हणजे १९८८ मध्ये पहिल्यांदा जागतिक तंबाखू विरोधी दिन एप्रिल महिन्यात साजरा करण्यात आला. मात्र, नंतर तो साजरा करण्यासाठी मे महिन्यात तारीख निश्चित करण्यात आली.

दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. १९८८ मध्ये मे महिन्याच्या शेवटच्या दिवशी तो साजरा करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन म्हणून तंबाखूचे सेवन थांबवण्यासाठी आणि त्यामुळे होणाऱ्या समस्यांची जाणीव करून देण्यासाठी साजरा करण्यात आला.

तज्ज्ञांच्या मते, तंबाखूच्या सेवनामुळे अनेक गंभीर आणि जीवघेण्या आजारांचा धोका वाढतो. फुफ्फुसाचा कर्करोग, यकृताचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग, आतड्याचा कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोग होण्याचा धोका असतो. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# एकाच फोनवर दोन नंबरवरून वापरा व्हॉट्सअॅप, वाचा ट्रिक

लोकप्रिय मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सअॅपमध्ये,युजर्सना एकाच फोनमधील दोन नंबरवरून व्हॉट्सअॅप वापरण्याचा एक सोपा पर्याय मिळत आहे. युजर्स सोप्या स्टेप्स फॉलो करून त्याच पमध्ये सहजपणे अकाउंट स्विच करू शकतात.



बहुतेक स्मार्टफोन ड्युअल सिम कनेक्टिव्हिटी देतात आणि युजर्स एकापेक्षा जास्त नंबर वापरत आहेत. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला दोन्ही नंबरवरून व्हॉट्सअॅप वापरायचे असेल, तर कोणत्याही युक्तीची गरज नाही. यापूर्वी व्हॉट्सअॅप फक्त एकाच फोनवरून वापरता येत होते. काही युजर्स थर्ड पार्टी प्सच्या मदतीने दोन व्हॉट्सप चालवू शकत होते, पण आता ही सक्ती संपली आहे.


**मल्टिपल अकाउंटला सपोर्ट**

मेटा-मालकीच्या मेसेजिंग पने आता पमध्ये मल्टिपल अकाउंटला सपोर्ट दिला आहे आणि युजर्स केवळ दोन नंबरवरून व्हॉट्सप चालवू शकत नाहीत तर पमध्ये एका खात्यातून दुसऱ्या खात्यावर सहजपणे स्विच करू शकतात. यासाठी वेगळे व्हॉट्सअॅप बिझनेस किंवा इतर कोणतेही अॅप डाउनलोड करण्याची गरज नाही. आताही अनेक युजर्सना याबद्दल माहिती नाही, म्हणून येथे स्टेप बाय स्टेप पद्धत सांगणार आहोत.

**फॉलो करण्यासाठी सोप्या स्टेप्स**

सर्वप्रथम, तुमच्या फोनमधील नवीनतम आवृत्तीमध्ये व्हॉट्सअॅप अपडेट करा आणि ते उघडा. आता तुम्हाला वरच्या उजव्या बाजूला टॅप करून सेटिंग्ज उघडावे लागतील. सेटिंग्जमध्ये तुमच्या नावापुढील डाउन रोवर टॅप करा. येथे तुम्हाला Add account पर्याय दिसेल, त्यावर टॅप करा. तुम्हाला समोर दिसणाऱ्या माहितीच्या खाली दिलेल्या Agree आणि continue बटणावर टॅप करावे लागेल. आता दुसरा नंबर टाका ज्यावरून तुम्हाला व्हॉट्सअॅप वापरायचे आहे. स्क्रीनवरील सूचना फॉलो करा आणि आवश्यक परमिशन द्या. शेवटी व्हेरिफिकेशन पूर्ण झाल्यानंतर या नंबरवरूनही व्हॉट्सअॅप सुरू होईल. दोन्ही अकाउंट होतील स्वातंत्र्यपणे हॅन्डल तुम्हाला हवे तेव्हा तुमचे खाते सहज बदलता येईल आणि दोघांच्या चॅट्स स्वतंत्रपणे ऍक्सेस करता येतील. तुमच्याकडे एकाच फोनवर दोन व्हॉट्सअॅप अकाउंट असल्यास नोटिफिकेशनना गोंधळात टाकण्यापासून रोखण्यासाठी, तुम्ही दोन्ही अकाऊंटसाठी स्वतंत्रपणे नोटिफिकेशन टोन सेट करू शकता. याशिवाय त्यांच्या प्रायव्हसी सेटिंगमध्ये वेगवेगळे बदल करण्याचा पर्यायही असेल.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



**निमित्त**

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्यादेवी होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा बीड) माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले.

खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते; खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्या-बाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई होळकरत्यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली, तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. अहिल्याबाई आता खऱ्या अर्थाने राज्यकर्ती झाल्या. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मीळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरापंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले.

अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला (१७९०), तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. महेश्वर येथे वृद्धापकाळाने १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




**चौक : पावसाची चाहूल लागली की मेंढपाळ आपल्या मायभूमीकडे प्रस्थान करीत असतात, कारण घाटमाथ्यावर चार महिने या मेंढरांना मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध होत असतो.** (छाया : अर्जून कदम)

## आरोग्य प्रहर

# तासन्तास सलग काम करणाऱ्यांनो इथे लक्ष द्या

आजच्या स्पर्धात्मक युगात प्रत्येकाला यश मिळवायचंय, करिअर घडवायचंय. पण या सगळ्यात तुम्ही तुमच्या आरोग्याची किती काळजी घेता हे देखील पाहणं तितकंच महत्त्वाचं आहे. कारण सिर सलामत तो पगडी पचार या वाक्याप्रमाणे जर तुमचं आरोग्य चांगलं असेल तरच तुम्ही काम करू शकता. त्यामुळे तासन्-तास सलग काम करणाऱ्यांनो तुम्हाला मायको ब्रेक घ्यायलाच हवा. पण काय आहे हा मायक्रो ब्रेक? काय आहेत याचे फायदे? जाणून घ्या...



आपण बऱ्याचदा अनेकांच्या तोंडातून ऐकतो, 'काम संपलं की मी आराम करेन' असं बोलून बहुतेक जण पुन्हा कामात व्यस्त राहतात. पण असं करणं ही मोठी चूक ठरू शकते. घरगुती आणि कार्यालयीन कामे न थांबता केल्याने तुम्ही आजारी पडू शकता. यामुळे तणाव आणि नैराश्य दोन्ही वाढू शकते. या समस्या टाळायच्या असतील तर 'मायक्रो ब्रेक्स' नक्कीच घ्या. मायक्रो ब्रेक हे छोटे ब्रेक असतात जे तुम्हाला कामावर परत येण्यासाठी रिचार्ज करतात. यामुळे तुमची कार्यक्षमता आणि फोकस दोन्ही वाढते. मायक्रो ब्रेक्स हे छोटे ब्रेक्स आहेत जे तुम्हाला कामावर परत येण्यासाठी रिचार्ज करतात. फक्त एक ते पाच मिनिटे लागतात. आणि ही विश्रांती शनिवार किंवा रविवारच्या विश्रांतीपेक्षा अधिक फायदेशीर असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. हे आपल्याला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आराम करण्यास अनुमती देते. हे मायक्रो ब्रेक तुमच्यावर लगेच परिणाम करतात आणि तुम्हाला आराम देतात.

सतत काम करताना थकवा आला की त्याचा तुमच्या कामाच्या गतीवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत काहीतरी नवीन विचार करणे कठीण होते. मायक्रो ब्रेक्स नवीन कल्पनांसाठी तुमचे मन रिफ्रेश करतात. या काळात श्वासोच्छवासाचे व्यायाम करावेत. यामध्ये लाइट स्ट्रेचिंग देखील फायदेशीर ठरेल.

जास्त वेळ सतत काम केल्याने एनर्जी लेव्हल कमी होते. जर तुम्ही ऑफिसमध्ये जास्त वेळ बसून काम करत असाल किंवा घरातील कामात गुंतले असाल तर मायक्रो ब्रेक्स तुम्हाला एनर्जी लेव्हल वाढवण्याची संधी देतात. यामुळे तुमचे हृदय निरोगी राहते आणि मधुमेहासारखे आजारही दूर राहतात.

पोमोडोरो तंत्र आपल्याला यामध्ये मदत करू शकते. ही एक अशी पद्धत आहे, जी २५ मिनिटांचे काम आणि त्यानंतर पाच मिनिटांच्या ब्रेकवर आधारित आहे. ज्यानंतर तुम्ही एजाइल वर्किंग म्हणजेच फ्लेक्झिबल काम करू शकता. पूर्ण वेळ एकत्र घालवण्यापेक्षा एखाद्याच्या सोयीनुसार काम करण्यावर आधारित आहे.

# खालापूर शिंदीवाडी पूल मोजतोय अखेरची घटका

## पावसाळ्यात गावाचा संपर्क तुटण्याची शक्यता; डागडुजीची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावोशी छत्तीसी विभागातील शिंदीवाडी (परखंदे) हे गाव साधारण १९६२ साली येथे वसलेले आहे. त्या वेळी या गावाशेजारी असलेल्या नाल्यावर दगडांच्या सहाय्याने पूल बांधण्यात आला आहे. तेव्हापासून येथील ग्रामस्थ हाच पूल ये-जा करण्यासाठी वापरत आहेत. अनेक वर्षांपासून या पुलाची डागडुजी झाली नसल्याने येथून प्रवास करणाऱ्या वाहनांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात हा



पूल कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने या गावाचा संपर्क तुटण्याची भीती वर्तविली जात आहे.

या गावातील बहुतांश लोक हे शहराकडे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने जात असतात. त्यांना याच पुलावरून नियमित प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या पुलासाठी शासकीय यंत्रणेने निधीची तरतूद करून तत्काळ नवीन पूल बांधवा, अशी मागणी शिंदीवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

मूळ परखंदे गावाशेजारी असलेले शिंदीवाडी हे गाव होय. पूर्वी या गावाला परखंदे याच नावाने ओळखले जात होते, मात्र हे गाव कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झाले असल्याने शासनाने या गावाला महसुली गावाचा दर्जा दिला. हे गाव १९६२ साली येथे वसलेले आहे. त्या वेळी या गावाला जोडण्यासाठी बांधलेला दगडाचा पूल आता पूर्णपणे जीर्ण झाला आहे. हा पूल नव्याने बांधण्यात यावा, अशी मागणी येथील ग्रामस्थांची आहे. जर हा पूल लवकर नव्याने बांधण्यात आला नाही तर मात्र शिंदीवाडी ग्रामस्थांचा खालापूर तालुक्यातील रस्त्याशी संपर्क तुटण्याची दाट शक्यता आहे. संबंधित यंत्रणांनी या पुलाच्या नूतनीकरणासाठी वेळीच लक्ष द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी गेले अनेक दिवस केली आहे.

# अलिबागमध्ये दोन अपघातात दोघे ठार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात बुधवारी (दि.२९) झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघेजण जागीच ठार झाले, तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

### तीन जण गंभीर जखमी

पहिला अपघात अलिबाग-रेवस मार्गावर बुधवारी रात्री दुचाकीचा अपघात झाला. किहीम येथील मिलिंद सुर्वे व त्यांचे सहकारी शैलेश करळकर असे दोघेजण दुचाकीवरून बुधवारी रात्री अलिबागहून रेवसकडे जात होते. ८.३० वा.च्या सुमारास आरसीएफ गेटसमोर एक पादचारी रस्ता ओलांडत होता. त्याला गाडीची धडक बसली. त्याचवेळी किहीमकडून येणाऱ्या दुचाकीला सुर्वे यांच्या दुचाकीने धडक दिली. या धडकेत अक्षय अनिल राणे या तरुणाचा मृत्यू झाला, तसेच मिलिंद सुर्वे, शैलेश करळकर आणि सागर मानुर असे तिघेजण जखमी झाले आहेत. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून हवालदार विनोद गायकवाड अधिक तपास करीत आहेत.

दुसऱ्या अपघातात कुर्डूस येथील सुतकवाडीतील महेंद्र मधुकर सुतक (वय ३५) यांचे बुधवारी सायंकाळी अपघाती निधन झाले. ते रामराज परिसरातील सत्यवाडी येथे शेणखताची माहिती घेण्यासाठी गेले होते. तेथून आपल्या दुचाकीवरून परतत असताना त्यांचे अपघाती निधन झाले.

# दहावी, बारावी निकालानंतर दाखले काढण्यासाठी लगबग

**रोहे : प्रतिनिधी**

नुकताच दहावी व बारावीचा निकाल लागला असून विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीतील अकरावी महाविद्यालये व अन्य विभागाच्या प्रवेशासाठी पालकांची लगबग सुरू झाली आहे. या प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू झाली आहे.



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या दहावी व बारावी या परीक्षेचा सीबीएसई बोर्ड व स्टेट बोर्ड परीक्षेचा निकाल लागला आहे. यावर्षी दोन्ही बोर्डचा निकाल चांगला लागल्याने दहावी व बारावीच्या परीक्षेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पुढील शैक्षणिक क्षेत्रात प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू झाली आहे. अकरावी विज्ञान, कला, वाणिज्य, टेक्निकल, डिप्लोमा कोर्ससह, इंजिनिअरिंग, मेडिकल, यासह विविध कोर्सेसकडे जाण्याचा विद्यार्थ्यांचा कल असतो.

महाविद्यालये निवडणे, प्रवेश निश्चितीसाठी अटी-शर्ती, फी तक्ता, मागील कटऑफ पाहणे त्यानुसार अंदाजे बांधणे, मोठ्या शहरात चांगल्या कनिष्ठ विद्यालयात प्रवेशासाठी पसंती निश्चित करून ऑनलाईन अर्ज भरणे आदीसाठी पालकांची धावपळ सुरू झाली आहे.

शाळेचा दाखला व गुणपत्रिका काढण्यासह विद्यार्थी व पालकांनी दहावी व बारावीचा निकाल लागल्यापासून शैक्षणिक कामासाठी कागदपत्रे काढण्यासाठी धावपळ सुरू केली असून रोहा तहसीलदार कार्यालय येथे विद्यार्थी व पालकांची गर्दी दिसून येत आहे.

उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, नॉनक्रिमीलेअर, रहीवाशी दाखली, इडब्लूएस, रहिवासी दाखला आदी दाखले काढण्यासाठी विद्यार्थी व पालकांची धावपळ सुरू झाली आहे. त्यासाठी लागणारे कागदपत्रांची जमवाजमव विद्यार्थी व पालक करताना दिसत आहेत.

तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यलय व ग्रामपंचायत कार्यालय अशी फेरी विद्यार्थी व पालकांची होताना दिसत आहे.

# विरार-अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पबाधितांना योग्य मोबदला द्यावा

## वैकुंठ पाटील यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन




**पेण : रामप्रहर वृत्त**

विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पांतर्गत तालुक्यातील एकूण आठ गावे बाधित होत आहेत. या गावांमधील जमिनींच्या भूसंपादनसाठी जिल्हास्तरीय समितीने आजअखेर दर निश्चित केले आहेत. या दरामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. यासाठी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देऊन तातडीने शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणी केली.

हमरापुर येथील शेतजमिनीसाठी समितीने प्रती चौ.मी. ८८२ रु. इतका दर निश्चित केलेला आहे. म्हणजेच भूसंपादन अधिनियमानुसार त्याचा गुणांक त्मावरील १२ टक्के व्याज आणि इतर बाबी यांचा एकत्रित विचार करून प्रति गुंठा ४,८०,००० रु.इतकी रक्कम निश्चित होत आहे, मात्र हमरापूर येथील जमिनीचे आजचे दर विचारात घेता पाच ते सहा लाख रुपये गुंठा अशा दराने बाजारमूल्य असून भूसंपादन अधिनियमानुसार चारपट मोबदला शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. आंबिवली व बळवली या गावांमध्ये निश्चित केलेल्या दरामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे.

यामुळे शेतकऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण होत आहे. यामुळेच आपण तातडीने लक्ष देऊन जिल्हाधिकाऱ्यांना निश्चित केलेल्या दरांचा फेरविचार करण्यासंदर्भात तातडीने आदेश द्यावेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# माणगाव येथील सावंत कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमती सविता निळकंठ सावंत जुनिअर कॉमर्स कॉलेजचा इ. बारावी परीक्षेचा निकाल ९६ टक्के इतका लागला आहे. या महाविद्यालयातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ नुकताच महाविद्यालयात उत्साहात झाला.

विजय पंप प्रा. लि. वापी गुजरातच्या संचालिका लता जयवंत सावंत यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. या वेळी संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत उपस्थित होते. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक यांनी या तिन्ही यशस्वी विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपये देऊन त्यांचा सन्मान केला.

विशेष बाब म्हणजे या महाविद्यालयात प्रथम आलेला विद्यार्थी हर्ष विलास महाडिक हा अंध असून महाविद्यालयात त्याची १०० टक्के उपस्थिती होती.

महाविद्यालयाच्या यशात प्रा. भारत पवार, प्रा. निकिता मांडवकर, प्रा. सारिका सायगावकर या शिक्षकांची कठोर मेहनत असून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची देखील मेहनत आहे. महाविद्यलयाचे प्रभारी प्रा. हर्षल जोशी, डॉ. माळी, प्रा. अशोक मोरे, अमित बाकाडे, दिलीप ढेपे, संजय गायकवाड व टीएमसी कॉलेजचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच सखाराम जाधव, सुभाष टेंबे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**१) मौजे. तळाघर, ता.रोहा, जि. रायगड, येथील मिळकत...**

| मालकाचे नांव | गट नं./ भूमापन क्र. | एकुण क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| यमुना सुमंत पाशिलकर | २१४/इ | जिरायत ०-५०-०० पो. ख. ०-००-०० एकुण ०-५०-०० | ९ = ४८ | १ |

**२) मौजे : सुखदरवाडी, ता. रोहा, जि. रायगड, येथील मिळकत ...**

| मालकाचे नांव | गट नं./भूमापन क्र. | एकुण क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| नरेंद्र सुमंत पाशिलकर व इतर | १५८ | विरकस २-९२-०० पो. ख. ०-४४-०० एकुण ३-३६-०० पैकी ०-७७-०० | २.१२ ०.२४ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दिनांक : ३०/०५/२०२४

सही/-
**ॲड.पी.जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा, जि. रायगड पिन नं.४०२१०९ मोबा नं.९२७२७१३९५६

# अवकाळीने नुकसान झालेल्यांना मदतीचा हात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले होते. कोणाचे घर कोसळले, काहींच्या घरावरचे छप्पर उडून गेले, तर घराच्या भिंतीदेखील कोसळल्या होत्या. आमदार महेंद्र थोरवे यांच्या थोरवे फाउंडेशनच्या वतीने नागरिकांना एक मदतीचा हात पुढे करण्यात आला.

मागील काही दिवस अवकाळी पावसाने थैमान घातले होते. या अवकाळी मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. प्रशासन काही ठिकाणी पोहचले तर लोकप्रतिनिधी केवळ भेट घेवून रिकाम्या हाताने परतले.

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनच्या माध्यमातून तालुक्यातील ३५हून अधिक वाड्या पाड्यावर नुकसानग्रस्त नागरिकांना संकेत भासे तर प्रसाद थोरवे यांच्या पुढाकाराने आतापर्यंत १०० कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला.

सुरुवातीला आर्थिक तर कोणाच्या घरावरचे छप्पर उडून गेले त्यांना सिमेंट पत्रे दिले आहेत. काही भागात विद्युत पोलदेखील देण्यात आले. नुकसानग्रस्त भागात हे साहित्य पोहचवण्याचे काम कार्यकर्त्यांनी चोख बजावले आहे.

तालुक्याचे शेवटचे टोक समजल्या जाणाऱ्या शेलू-बेडीस गाव येथेही उपतालुकाप्रमुख अंकुश शेळके यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सिमेंट पत्रे गावात पोहचले होते. या वेळी बुधीबाई दरोडा, ज्ञानेश्वर भगत, जयेश जाधव, विशाल राठोड अन्य पदाधिकारी पोहचले होते.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते कि, माझे अशील खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याच्या प्रक्रियेत आहेत. सदर मिळकत १) श्री. अभिमन्यू नरेंद्र भल्ला, २) श्री. प्रशांत बाळकृष्ण झुंजारराव, ३) श्री. शैलेश रामलाल ओसवाल, ४) श्री. सिद्धार्थ नरेंद भल्ला यांच्या मालकीची असून, ते संपूर्ण मालक असल्याचा दावा करतात तसेच त्या संपूर्ण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा हा त्यांच्याकडे असून विक्रीयोग्य शीर्षक आहे आणि सर्व प्रकारच्या भारांपासून मुक्त आहे आणि त्यांना हि मिळकत विकण्याची आणि त्याचा संपूर्ण मोबदला त्यांच्या नावे घेण्याचा अधिकार आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**परिशिष्ट**
**मौजे नितळस, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट नं / हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार |
|---|---|---|
| ८५/२ | ०-७७-१० | ७.७५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिचे कोणतेही भागावर ह्या पूर्वी विक्री, देणगी, वहिवाट, देखभाल, समजोता, साठेकारार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारस हक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, सबलीज, लीएन, अथवा कोणतेही हक्क असलेल्या सर्व संबंधिताना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हरकती कागदोपत्रांसहित खालील सही करणार यांच्याकडे रजिस्टर पोष्ठाने वरील मुदतीत लेखी कळविणे आवश्यक आहे. व्याज, वाटा, मागणी जर असेल तर, सर्व मुळ कागदपत्रे आणि पुराव्यांसह कळविणे, जर कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेद बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेली कोणतीही हरकती, तक्रार, दावे आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व असे सर्व दावे आणि मागण्या जाणूनबुजून सोडून दिलेले, आत्मसमर्पण केलेले, त्याग केलेले, सोडलेले, पूर्णपणे माफ केलेले आहे असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
**मनिष रवींद्र बोहरा**
वकील उच्च न्यायालय
१०४, १४२ अ, धनश्री बिल्डींग, युनियन बँक ऑफ इंडिया च्या वर, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल ४१०२०६.
फोन नं. ७०२१७७९६७९.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## उरण नगरपरिषद, उरण
ता. उरण, जिल्हा-रायगड, पिन कोड-४०० ७०२
Email ID : uranmunicipal@gmail.com
दूरध्वनी क्रमांक : २७२२२३२०

जा.क्र. : उनप/बांवि/वि./३३८/२०२४-२०२५
दिनांक : ३०/०५/२०२४

### जाहीर नोटीस
**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये जाहीर सूचना**

उरण नगरपालिका क्षेत्रातील मिळकतीधारकांना सूचित करण्यात येते, की पावसाळ्याचे दिवस येत आहेत. आपल्या इमारतीचा कोणताही भाग धोकादायक स्थितीत, पडावयास झालेला असल्यास अथवा काही भाग अर्धवट पडलेल्या स्थितीत असल्यास तो भाग त्वरित काढून टाकावा. तसेच धोकादायक इमारतींची तज्ञ स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत पाहणी करुन त्यांच्या अहवालाची एक प्रत नगरपालिकेत जमा करावी. सदरच्या पडावयास झालेल्या भागाची किरकोळ दुरुस्ती असेल तर ती नगरपरिषदेची पूर्वपरवानगी घेवून पडावयास झालेल्या किंवा जीर्ण अवस्थेत असलेल्या भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. जुने बांधकाम पाडून नवीन बांधकाम करावयाचे झाल्यास तसे विहीत प्रस्ताव नगरपरिषदेकडे दाखल करुन रितसर परवानगी घेवून बांधकाम करावे.

रस्त्यास कडेस धोकादायक इमारत असल्यास रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्या नागरीकांचे जीवितास कोणताही धोका पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. याकामी संबंधित नागरीकांनी वेळीच दक्षता न घेतल्यास कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. धोकादायक इमारतीमुळे कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास मिळकतधारकांची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

धोकादायक इमारतींबाबत किंवा जागेबाबत वाद असल्यास न्यायालयाचे कोणतेही आदेश असल्यास त्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी. धोकादायक इमारतीबाबत न्यायालयाचे निर्दशनास आणून न्यायालयाची पूर्वपरवानगी घेवून कार्यवाही करण्यात यावी. याबाबत स्पष्ट नोंद घ्यावी. नगरपरिषदेस सहकार्य करावे.

सही/-
**मुख्याधिकारी**
उरण नगर परिषद

# नवी मुंबईत भिकारी बनताहेत गुन्हेगार

## नेरूळमधील चोरी सीसीटीव्हीत कैद | नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईमध्ये वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस आपल्या परीने सर्व प्रयत्न करत आहेत, मात्र गरजू समाजाच्या दृष्टीने पाहत असणारे गरीब, गरजु भिकारी आता हळूहळू गुन्हेगारीकडे वळले आहेत. अशीच एक घटना बुधवारी पहाटे नेरूळ सेक्टर १६ ए मध्ये घडली. सीसीटीव्हीमध्ये ही घटना कैद झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन समाज मध्यामांवरून केले जात आहे.

नेरूळ सेक्टर १६ ए, प्लॉट नंबर १९० प्रेमनिवास ह्या आपल्या राहत्या घरातुन प्रशांत तपासे हे सकाळी ७ वाजता मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडले असता, घरात मुलगा व पत्नी झोपले होते. भिकाऱ्याच्या वेषात असलेल्या गुन्हेगारांनी थोडावेळ पाळत ठेवून आपल्या एक साथीदाराला घराबाहेर थांबवले. उर्वरित तिघांनी घरात प्रवेश केला. विशेष म्हणजे या तिघांमध्ये दोन महिला व दोन लहान मुलांचा समावेश होता. त्यांनी चतुरपणे घरातून मोबाईल व पैशाची बॅग पळवली. ही



चोरी दिवसाढवळ्या करण्यात आली. चोरी इतक्या सावधपणे करण्यात आली की, घरातील लोक झोपलेले पाहुन घरातील तिसऱ्या मजल्यावर जाऊन मोबाईल आणि पैशाची बॅग घेऊन हे गुन्हेगार पसार झाले. तत्काळ नेरूळ पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंद करण्यात आली व पोलीस ह्या घटनेची चौकशी करत आहेत.

हा सर्व प्रकार नवी मुंबई महापालिकेच्या वतीने बसवण्यात आलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते किरण पवार यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या सीसीटीव्हीच्या विशेष अधिकारांतर्गत गुन्हेगाराचे संपूर्ण रेकॉर्डिंग काढून दीले. त्यामुळे या चोरीची पद्धत उघड झाली असून, नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील कारवाईसाठी सुरुवात केली.

**नागरिकांना आवाहन केले आहे की, कृपया आपण आपल्या सोसायटी व परिसरात अशा प्रकारचे भिकारी, फेरीवाले किंवा इतर कोणीही जे भीक मागण्यांच्या उद्देशाने आपल्या घराजवळ किंवा सोसायटीमध्ये येत असतील तर त्यांना वेळेतच आडवा नाही तर उद्या आपल्याकडेदेखील ह्या गुन्ह्याची पुनरावृत्ती होऊ शकते.**
**–किरण पवार,**
**सामाजिक कार्यकर्ते, नेरूळ**

### आवर घालण्याची मागणी

नवी मुंबईत सर्वत्र या भिकाऱ्यांनी आपले ठाण मांडले आहे. उघड्यावर जेवण करणे, अंघोळ ना करता राहणे, खुल्यावर नैसर्गिक विधी केले जात आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना हात लावून भिक मागणे, त्यामुळे महिला वर्गातदेखील दहशत वाढली आहे. अशात आता या भिकाऱ्यांनी चोरी करण्यास सुरुवात केल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे.

# नालेसफाईत निष्काळजीपणा नको

## नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका क्षेत्रात नैसर्गिक नालेसफाई अंतिम टप्प्यात असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवी मुंबईच्या उत्तरेकडून दिघा, ऐरोली विभागापासून नालेसफाई कामांच्या प्रत्यक्ष पाहणीला सुरूवात करीत अधिक सखोल नालेसफाई करण्याचे निर्देश दिले.

यावर्षी कुठेही पाणी साचून राहणार नाही असा दिलासा नागरिकांना देताना आयुक्तांनी ७७ मोठ्या नैसर्गिक नाल्यांची १०० टक्के सफाई पूर्ण झाली असून उर्वरित १९ मोठ्या नाल्यांची साधारणत: ३० टक्के राहिलेली सफाई येत्या पाच दिवसांत पूर्ण होईल, असे सांगितले. ही नालेसफाई जलद गतीने करताना योग्य रितीने व संपूर्ण स्वच्छता होईल, याकडे बारकाईने लक्ष देऊन करावी अशा सक्त सूचना आयुक्तांनी दिल्या. यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश देतानाच आयुक्तांनी नालेसफाई करणारे कामगार हे गमबूट, हँडग्लोव्हज अशी सुरक्षा साधने वापरूनच काम करीत असल्याची खात्री करून घ्यावी, असेही निर्देशित केले.

नाल्यांची सफाई होत असताना त्यातून काढला जाणारा गाळ लगेच उचलण्यात यावा तसेच काही नाल्यांचे डिसेल्टिंग करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले असून तेही काम लगेचच पूर्ण करून घेण्याचे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

यापूर्वी आयुक्तांनी दिघा विभागाच्या पावसाळापूर्व पाहणीमध्ये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने कामे झाली आहेत काय याची पुनर्पाहणी केली. दिघा भाग काहीसा सखल आहे. तसेच इलठणपाडा येथील धरणाचा



विसर्ग पश्चिमेकडील खाडीकडे वहात येताना मध्ये झोपडपट्टी, एमआयडीसी भागातील नाले काहीसे अरूंद असल्याने त्यांची सखोल सफाई होणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन नाल्यांतून खाडीत वाहून जाणारे पाणी विनाअडथळा वाहून जाण्याच्या दृष्टीने नालेसफाईची पाहणी केली व अधिक सखोल नालेसफाईचे निर्देश दिले.

या वेळी काही ठिकाणी नाल्यांमधून जाणाऱ्या केबल्समुळे प्रवाहात कचरा अडून राहू शकतो हे लक्षात घेत त्याठिकाणी चॅनल टाकावेत व केबल त्यावर बांधून पाण्याच्या प्रवाहाला अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्तांमार्फत देण्यात आल्या. त्याचप्रमाणे नाल्यांच्या काठांच्या भिंतीवर उगवलेली रोपटीही काढून टाकावीत, असे त्यांनी सूचित केले.

### परिसर स्वच्छतेकडेही लक्ष देण्याच्या सूचना

नालेसफाईप्रमाणेच परिसर स्वच्छतेकडेही काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देताना आयुक्तांनी स्वच्छता ही आपल्या शहराची ओळख असल्याने स्वच्छतेबाबत कुठलाही हलगर्जीपणा चालणार नाही, असे स्पष्ट संकेत दिले. रस्त्यांच्या शेजारील हरितपट्टे तसेच सुशोभित जागा यांची नियमित निगा राखण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच पदपथ नागरिकांना चालण्यासाठी विनाअडथळा खुले राहतील तसेच त्यावरील झाकणे तुटली असतील तर ती तातडीने बदलून घ्यावेत, असेही आयुक्तांनी निर्देशित केले.



# कोपरखैरणे विभागात अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागामध्ये महापालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतरित्या बांधकाम केले होते. त्यांना नोटीस बजावण्यात आली होती. त्याअनुषंगाने बांधकामावर निस्कासनाची कारवाई करण्यात आली व त्यांच्याकडून प्रत्येकी २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. ढाबा, भंगारव्याल्याची शेडसुध्दा निष्कासित करण्यात आली.



या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाकडील अधिकारी अथवा कर्मचारी, न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त तसेच, आठ मजूर, एक पिकअप व्हॅन, दोन इलेक्ट्रॉनिक हॅमर, एक गॅस कटर, एक जे.सी.बी इत्यादचा वापर करण्यात आला. यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# घणसोलीत झोपड्या जमीनदोस्त

**नवी मुंबई :** महापालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रात से.१५ येथील पामबीच रोड लगत साईबाबा मंदिर, जवळील मोकळ्या जागेवर विनापरवानगी अनधिकृतपणे साधारणत: २५ पत्र्याच्या झोपडया उभारण्यात आल्या होत्या. या ठिकाणी अवैधरित्या उभारण्यात आलेल्या सर्व झोपड्यांवर अतिक्रमण विभाग, घणसोली विभाग कार्यालय यांचेकडून मोहीमे राबवत सर्व झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत.



महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार आयोजित या मोहिमेमध्ये एक जे.सी.बी., चार कामगार यांचा समावेश होता. ही धडक मोहिम अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली, घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय तायडे व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने राबविण्यात आली. यापुढील काळातही अशा प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे.

# नवी मुंबई भाजपतर्फे जितेंद्र आव्हाडांचा निषेध

## जोडे मारो आंदोलनासह अटकेची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेले पोस्टर फाडणारे जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात नवी मुंबई जिल्हा भाजपतर्फे वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जळजळीत निषेध आंदोलन करण्यात आले.

नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनामध्ये माजी महापौर सागर नाईक यांच्यासह दशरथ भगत, सतीश निकम, संपत शेवाळे, नवीन गवते, अमित मेढकर, राजू शिंदे, विविध मोर्चाचे प्रमुख, लोकप्रतिनिधी, भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात या वेळी जोरदार घोषणा देण्यात आल्या तसेच त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्या अटकेची मागणी करण्यात आली. आव्हाड यांच्या प्रतिमेला चपलांचे जोडे मारून त्यांचे पोस्टर फाडून त्यांचा निषेध करण्यात आला. कोणत्याही गोष्टीची स्टंटबाजी करणे ही आव्हाड यांची जुनी सवय आहे. आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी महामानवाचा अपमान करणाऱ्या आव्हाडांच्या कृतीचा संपूर्ण महाराष्ट्र निषेध करतो आहे, असा हल्लाबोल जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला समता आणि बंधुतेचा विचार दिला. आव्हाडांना राजकीय हेतू साध्य करण्यासाठी आपण काय करतोय याचे भान राहिले नाही. बाबासाहेबांचे पोस्टर फाडून त्यांनी अक्षम्य असा गुन्हा केला आहे. त्यांच्या पोटातले कृतीत उतरले आहे.

ऐतिहासिक अशा महाडमध्ये आव्हाड यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर फाडून त्यांचा अवमान केला, अशी टीका नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी केली. आव्हाड यांचे विचार सकारात्मक नसून नकारात्मक आहेत. त्याच्यात राजकीय स्वार्थ दिसून येतो, असे सांगितले.

नवी मुंबई भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष राजू शिंदे यांनी बाबासाहेबांच्या अवमान प्रकरणी देश त्यांना कधीच माफ करणार नाही, असे प्रतिपादन केले. नवी मुंबई भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित मेढकर यांनी आव्हाड म्हणजे 'खोटं बोल पण रेटून बोल' असे असल्याचे म्हटले. मनुस्मृतिबाबतच्या शिफारशींवर राज्य सरकारने निर्णय घेतला नसताना त्या विरोधात आंदोलन म्हणजे आव्हाड यांची स्टंटबाजी असल्याचा आरोप त्यांनी केला.

# नवी मुंबईत ५२७ इमारती धोकादायक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२४-२०२५ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणानंतर महापालिका क्षेत्रात एकूण ५२७ इमारती महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ६२ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ११३ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरुस्ती करणे अशा 'सी-२ बी' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ३०३ इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरुस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ४९ इमारती, अशाप्रकारे एकूण ५२७ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे.

ही यादी नवी मुंबई महापालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी - १' प्रवर्गामध्ये नमूद ६२ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक अक्षरात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.



महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार घोषित इमारतींमध्ये वास्तव्य करणारे मालक अथवा भोगवटादार यांना ते राहत असलेली इमारत निवासी अथवा वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत आणि या इमारतींमधील निवासी अथवा वाणिज्य वापर तत्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील ५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना अथवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. 'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादाऱ्यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा संभव लक्षात घेऊन इमारतीचा अथवा बांधकामाचा निवासी अथवा वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि सदरची इमारत अथवा बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, इमारत अथवा बांधकाम कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, नवी मुंबई महापालिका यास जबाबदार राहणार नाही, असे स्पष्टपणे सूचित करण्यात आलेले आहे.

या नोटिसीमध्ये धोकादायक इमारतींच्या नावासमोर रहिवास वापर सुरु आहे अथवा नाही याचीही नोंद करण्यात आलेली आहे. इमारतीच्या वर्गीकरणानुसार इमारतींचा भोगवटा वापर अथवा रहिवास करणाऱ्या नागरिकांनी इमारत तत्काळ निष्कासीत करावयाची आहे किंवा वर्गीकरणानुसार नमूद केल्याप्रमाणे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या भोगवटाधारकांनी इमारत दुरुस्त करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही प्रकारे धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

पावसाळा कालावधीत धोकादायक झालेल्या इमारतींचा अथवा घरांचा वापर करणे धोक्याचे आहे. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते. म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा अथवा घरांचा रहिवास अथवा वापर तत्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे, अन्यथा दुर्देवीरित्या अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावयाची आहे.

# बेलापूर आणि तुर्भे विभागात हॉटेल, बार, पबकडून दंडवसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका क्षेत्रात बेलापूर विभागातील तीन लेडीज बार अथवा पब, एक ढाबा, तीन चायनीज तसेच तुर्भे विभागातील तीन पब अथवा बार यांच्यावर २८ मे रोजीच्या रात्रीपासून व पहाटेपर्यंत कारवाई करण्यात आली. या कारवाईपोटी एक लाख रुपये इतकी दंडात्मक वसुली करण्यात आली. ही कारवाई नवी मुंबई पोलीस आयुक्तालय व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्यासह नवी मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली.

मोहीम अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल, नेरूळ विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत धांडे आणि अतिक्रमण विभागाचे कनिष्ठ अभियंता यांच्या सहयोगाने करण्यात आली. यापुढेही अशीच तीव्र कारवाई करण्यात येणार आहे.

# एसएससी परीक्षेत एन.आर. भगत विद्यालयाचा १०० टक्के निकाल



**नवी मुंबई : बातमीदार**

एनआरबी एज्युकेशनल सोशल अँड कल्चरल ट्रस्ट संचलित शिक्षण प्रसारक विद्यालय व ए.न. आर भगत इंग्लिश विद्यालयाने यंदाही आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली.

शिक्षण प्रसारक विद्यालयातील तन्वी पंढरीनाथ पिंगळे ८८.८० टक्के, सार्थक वैजनाथ अवचार ८६.८० टक्के, मनीष दत्ताराम निकम ८५.४० टक्के, प्राची भरत जाधव ८५ टक्के एन आर भगत इंग्लिश स्कूलची गीतांजली शंकर सौद ८५.४० टक्के, नम्रता बर्मा ८०.४० टक्के हसन मोहम्मद शेख ७९.४० टक्के यांनी उत्तुंग यश मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत यांनी केला.

या वेळी मुख्याध्यापिका प्राजक्ता कोठेकर, वंदना पाटील प्रशासकीय अधिकारी नसीम शरीफ, संस्थेचे खजिनदार अशोक पाटील उपस्थित होते.

# रायगडात जितेंद्र आव्हाडांविरोधात भाजप आक्रमक

## अलिबाग, रोहा, माणगावमध्ये निषेध




**अलिबाग, धाटाव, माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जलसंगर उभारत मानवतेची शिकवण दिलेल्या महाडच्या पवित्र भूमीत येऊन शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी मनुस्मृतीचे दहन केले, पण या जल्लोषात त्यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेले पत्रक फाडले. यामुळे भाजप आक्रमक झाले असून जिल्हाभरात जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला. त्याचप्रमाणे त्यांच्या त्वरीत कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर आणि अलिबाग शहर प्रमुख अंकित बंगेरा यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आमदार आव्हाड यांच्या फोटोला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. या वेळी आ. जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जितेंद्र आव्हाड यांच्या अटकेची मागणीही करण्यात आली.

दरम्यान उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना पत्र लिहून आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली आहे. आपण स्वतः अनुसूचित जमातीचे आहोत. मनुस्मृती दहन आंदोलनादरम्यान आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेले पोस्टर फाडून फेकून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमचे दैवत असून समस्त आंबेडकरी अनुयायांच्या भावना या कृत्यामुळे दुखावल्या आहे. जितेंद्र आव्हाड यांचे कृत्य समाजात विषमता पसरवणारे असून आव्हाड यांनी मागास समाजाचा अवमान केला आहे. त्यामुळे आव्हाड यांच्याविरोधात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भोईर यांनी दिला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अपमान केल्याने रोशन चाफेकर यांच्या नेतृत्वात भारतीय जनता युवा मोर्चाने रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांसह रोहा नगरपालिकेसमोर गुरुवारी (दि. ३०) निषेध व्यक्त केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सा. बां. मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, दक्षिण जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, मार्गदर्शक सतिश धारप, युवा मोर्चा महाराष्ट्र अध्यक्ष राहुल लोणीकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, युवा मोर्चा महाराष्ट्र सरचिटणीस निखिल चव्हाण, दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगडमधील प्रत्येक तालुक्यात आंदोलन होणार आहे.

या वेळी रोशन चाफेकर यांनी, जितेंद्र आव्हाड हे स्वतःला विद्वान समजतात, मात्र ते भान नसलेले व्यक्ती आहेत कारण हे पत्रक फाडत असताना त्यांच्या कार्यकर्त्याने त्यांना जाणीव करून दिली की, ते बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडत आहेत, मात्र त्यांनी कोणालाही न जुमानता फोटो फाडले. त्यामुळे ते माफीसाठी पात्र नाहीत. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असे सांगितले. याबाबत निवेदन तहसीलदार किशोर देशमुख यांना देण्यात आले. रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे हे उपस्थित होते.

या आंदोलनावेळी तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा दक्षिण रायगड चिटणीस नरेश कोकरे, दक्षिण भारत सेल जिल्हाध्यक्ष पी. व्ही. सनल कुमार, ज्येष्ठ नेते विपुल शाह, रोहा तालुका चिटणीस शैलेश रावकर, दक्षिण रायगड चिटणीस श्रद्धा घाग, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस रिया कासार, युवा वॉरिअर संयोजक दक्षिण रायगड वैभव कुळकर्णी, सचिन मोरे, युवा मोर्चाचे अनिल घरजाळे, रितेश किर्तने, संकेत देसाई, शुभम मोहिते, युवा मोर्चा रोहा माजी सरचिटणीस दिपक मोरे, रोहा तालुका आईटी सेल अध्यक्ष निखिल बोरोले, भरत ठाकरे, करण सोनावणे, रोहित सिंग यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माणगाव बसस्थानकासमोर बुधवारी (दि.२९) सायंकाळी भारतीय जनता युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या नेतृत्वाखाली महामार्गावर येऊन जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून तसेच त्यांच्या प्रतिमेचे दहन करून त्यांच्याविरूद्ध घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांना जितेंद्र आव्हाड यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

या वेळी तालुका भाजप अध्यक्ष उमेश साटम, तालुका सरचिटणीस गोविंद कासार, अ‍ॅड. नितीन आंब्रे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रितेश निवाते, ट्रान्सपोर्ट अध्यक्ष आदेश महाडिक, युवा मोर्चा सरचिटणीस अमोल पवार, उपाध्यक्ष मंदार मढवी, उपाध्यक्ष ओमकार गायकवाड, राजू सुतार, ग्रामपंचायत सदस्य संजय जुमारे, सचिन सत्वे, अनिकेत कांबळे व कार्यकर्ते उपस्थित होते.







## तेलंगणातील आरोपींना माणगावमध्ये अटक



**माणगाव : प्रतिनिधी**

तेलंगणा राज्यातील मनकलगाव येथे एका महिलेची सोन्याची चेन घेऊन पसार झालेल्या दोघा चोरट्यांना माणगाव पोलिसांनी रेल्वेस्थानकावरून अटक केली आहे.

या गुन्ह्यातील फिर्यादी गड्डमेदी कल्पना महेंदर या मॉर्निंग वॉककरिता गेल्या असता त्यांचे गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून आरोपी धनला बाबू बालाजी गायकवाड (रा. मुबारक नगर, निजामाबाद मूळ रा. खारपूर ता. देगलूर जि. नांदेड) व समशेर सिंग चतुरसिंग टाक (रा. बिचुकुंडा निझामाबाद, तेलंगणा) हे दोघेही पसार झाले होते. त्यांच्यावर तेलंगणा राज्यात एकूण ३७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचे नेतृत्वाखाली पथके तयार करण्यात आली होती. त्याप्रमाणे गस्त वाढविण्यात आली होती. हे आरोपी माणगाव रेल्वेस्टेशन येथे असल्याची गोपनीय माहिती बातमीदारामार्फत मिळाल्याने पथकांनी सापळा रचून आरोपींना बुधवारी (दि.२९) ताब्यात घेतले. त्यांनी आपल्या गुन्ह्यांची कबुली दिल्याने त्यांना पहाडीशारीफ पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे व उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांचे अधिपत्याखाली माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील, पोलीस उपनिरीक्षक कितीकुमार गायकवाड, हवालदार रावसाहेब कोळेकर, शिपाई रामनाथ डोईफोडे, पवार यांनी पार पाडली.

## रमेश धनावडेंना साहित्य भूषण पुरस्कार

**नागोठणे : बातमीदार**



साहित्यिक रायगड भूषण रमेश धनावडे यांनी केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य क्षेत्रांमधील कार्याची दखल घेऊन त्यांना मराठी साहित्य मंडळाने सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

बुलढाणा लोणार सरोवर येथे झालेल्या एका कार्यक्रमामध्ये त्यांना गौरविण्यात आले. त्यांचे मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह (महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध ६३ कविंवरील यशोगाथा) प्रकाशित झाला आहेत.


## निवडक

### दिपाली भावसार यांना पुरस्कार




**कर्जत** : कर्जत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आदिवासी) दिपाली भावसार यांना नाशिक येथे आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असल्याने त्यांना महाराष्ट्र शिक्षक फाउंडेशनद्वारे संचलित महाराष्ट्र शिक्षक पॅनल सदस्याच्या वतीने राज्यस्तरीय शिक्षक सेवा सन्मान पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अभिनेत्री किशोरी शहाणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी कविवर्य अनंत राऊत, एमएसपीचे अध्यक्ष दीपक चामे, सचिव सतीश कोळी, रंगनाथ सगर, प्रणोती विवेक आदी उपस्थित होते.

### अशोक मोरे यांचा सेवापूर्ती समारंभ



**मुरूड** : तालुका सहाय्यक निबंधक अशोक मोरे हे नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्याने पतसंस्थांतर्फे आयोजित सेवापूर्ती समारंभात त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी राजिम बँकेचे मुरूड शाखा व्यवस्थापक गणेश पुगावकर, जयश्रीराम पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन प्रा. मेघराज जाधव, सरव्यवस्थापक संजय ठाकूर, प्रमोद वाघमारे, परस्पर पतसंस्थेचे चेअरमन विजय पैर, महात्मा फुले पतसंस्थेचे व्यवस्थापक राकेश मसाल, मर्चंट क्रेडीट सोसायटीचे व्यवस्थापक देवेंद्र मसाल, आदर्श पतसंस्थेच्या व्यवस्थापिका सुप्रिया काळबेरे, वाल्मिकी पतसंस्थेचे संचालक कृष्णा अंबाजी, निलेश बिरवाडकर, दीपक फलेभाई, श्रीकाळ भैरव पतसंस्थेचे संचालक निवास रसाळ, दीपक मयेकर, प्रशांत कासेकर, कोर्लई ग्रामीण पतसंस्थेचे व्यवस्थापक वेगस, प्रभात ग्रामीणचे गोविंद, आर. आर. परदेशी आदी उपस्थित होते.

## रेवदंड्यातील अवैध धंदे बंद करण्याची ग्रामसभेत मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

दारू, मटका, जुगार यामुळे अनेक कुटूंबे उद्ध्वस्त झाली आहेत. रेवदंड्यात अनेक युवा मटका व दारू यांचे आहारी गेले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत हे अवैध धंदे बंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

रेवदंडा ग्रामपंचायतीची ग्रामसभा गुरुवारी (दि.३०) झाली. या सभेचे अध्यक्षस्थानी सरपंच प्रफुल्ल मोरे यांनी भूषविले. ग्रामविकास अधिकारी समीर म्हात्रे, सदस्य राजन वाडकर, संतोष मोरे, सुराराम माळी, दुशांत झावरे, खलिल तांडेल, तसेच ग्रामस्थ स्वप्निल रानवडे, दिपक वैद्य, सुभाष शेळके, समिर आठवले, केदार खोत, किशोर मानकर, पिटनाईक, वनिता पाटील आदींसह इतर ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसभेच्या वेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मुख्य क्लार्क सुभाष मानकर यांनी मागील सभेचे इतिवृत्तात वाचन केले. या वेळी दिपक वैद्य यांनी महावितरणच्या व्होल्टेजचे कमी प्रमाण, जीर्ण झालेल्या तारा, पोल आदीविषयी माहिती दिली व आगरकोट किल्ला परिसरात लाईट व्यवस्था देण्याची मागणी केली. त्यानंतर आंग्रेनगर ग्रामस्थांनी पारनाकानजीक लेनमध्ये मटका, जुगार जोरदार सुरू असून युवा पिढी व्यसनाधीन होत आहे. हे अवैध धंदे त्वरीत बंद करावेत, अशी मागणी केली. याबाबत रेवदंडा पोलिसांकडे रितसर तक्रार करण्यात येईल, अशी माहिती सरपंच प्रफुल्ल मोरे यांनी दिली, तसेच नारायण आळी येथील तलावाचे सुशोभीकरण, ठिकठिकाणच्या स्वच्छतागृहांची स्वच्छता आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांनी सांगितले की, अवैध धंद्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. शेवटी ग्रामसेवक समीर म्हात्रे यांनी आभार मानले.

## धाटाव एमआयडीसीतील वायू प्रदूषणाने नागरिक हैराण

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातून वायूप्रदूषण होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. गेले दोन दिवस हवेत रासायनिक वायू हवेत सोडल्याने दुर्गंधी पसरली आहे.



रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रात अनेक रासायनिक कारखाने आहेत. या कारखान्यातील विविध प्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या दूषित सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर असताना काही कारखान्यातून सकाळी हवेत दूषित वायूही सोडले जात आहेत. गेले दोन दिवस सकाळी हवेत सफेद रंगाचे वायू दिसत आहेत. याचा त्रास धाटावनजिकच्या गावांना होतो.

किल्ला ते भुवनेश्वर परिसरापर्यंत या रासायनिक वायूची दुर्गंधी पसरली आहे. याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्वरीत या कारखान्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## चारधाम दर्शनासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उत्तराखंडमध्ये पवित्र चारधामला भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. चारधाम यात्रेतील दर्शनाची प्रक्रिया सुसंगत करण्यासाठी, उत्तराखंड सरकारने नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे.

नोंदणी सर्वांसाठी अनिवार्य आहे. भक्तांनी नोंदणीसाठी https://registration andtouristcare.uk.gov.in/ या संकेतस्थळावर भेट द्यावी. नोंदणी केलेल्या यात्रेकरूंनाच दर्शनासाठी परवानगी देण्यात येईल.

वरिष्ठ नागरिकांनी चारधाम यात्रेपूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे, तसेच आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनाचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन उत्तराखंड शासनाने केले आहे.

## रायगड जिल्ह्यात अनोख्या फायरप्लेसची क्रेझ

**पाली : प्रतिनिधी**

निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी पाली सुधागडसह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फार्महाऊस विकसित झाले आहेत. येथे आकर्षक घराबरोबर बगीचा व सुशोभीकरण यावर अधिक भर दिला जातो, तसेच रात्रीच्या वेळी आग पेटवून निवांत बसण्यासाठी तसेच मासे, चिकन भाजण्यासाठी आणि शेकोटी व पोपटीसाठी विशेष जागेला पसंती दिली जाते.

यासाठी विशेष फायरप्लेस बनविण्याला मागणी आहे. आकर्षक व शास्त्रशुद्ध पद्धतीने बनविलेली फायरप्लेस (आगीची जागा) अनेक फार्महाऊसवर दिसत आहे.

राज्यभरातील पर्यटकांकडून पर्यटनासाठी रायगड जिल्ह्याला पसंती दिली जाते. प्रत्येक विकेंडला त्याचप्रमाणे इतर सुट्ट्यांच्या दिवशीही कुटुंबीय व मित्रमंडळी सोबत अनेकजण फार्महाऊसला येतात. अनेकांना संध्याकाळी



फार्महाऊस बाहेर बसून निसर्गाचा आनंद घ्यायचा असतो.

अशा वेळी गारवा असो व उष्मा बाजूला शेकोटी लागते. म्हणून अशा प्रकारची खास जागा तयार करून घेतली जाते. मग येथे छानपैकी चिकन, मासळी भाजली जाते. शिवाय रायगडातील खास पोपटीसाठी ही जागा उत्तम असते.

गप्पागोष्टी मारत भाजलेल्या विविध शाकाहारी व मांसाहारी पदार्थ बनवून तेथेच त्यांचा आस्वाद घेत मज्जा केली जाते. शिवाय रात्रीच्या वेळी हिंस्त्र श्वापदांपासून संरक्षणदेखील होते. त्यामुळे सध्या अशा फार्महाऊसला पर्यटकांची पसंती मिळत आहे.

### अशी बनवतात फायरप्लेस

*फार्महाऊसच्या बाहेर जागा निश्चित केली जाते. त्याठिकाणी एक खड्डा करून तो दगड लावून व्यवस्थित केला जातो. त्याच्या बाजूला जमीन जास्त गरम व्हायला नको म्हणून दगड किंवा विटा वापरून बांधकाम केले जाते. अतिशय स्वस्त व टिकाऊ काम होते आणि दिसायला पण छान दिसते.*

**शाकाहारी व मांसाहारी दोन्ही लोकांसाठी हे फायद्याचे असते. सध्याच्या घडीला आपल्या फार्महाऊसमध्ये अशी फायरप्लेस असणे प्रतिष्ठेचे मानले जाते. त्यामुळे बहुतेक जण आवर्जून ती बनवून घेत आहेत. शिवाय खर्च व वेळ कमी लागतो.**

**–अमित निंबाळकर, फार्महाऊस डेव्हलपर्स, रायगड**

## खोपोलीत मध्यरात्रीपर्यंत बत्ती गूल; नागरिक हैराण

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात वीज वितरणचा पुरता बट्ट्याबोळ झाल्याचे मंगळवारी पुन्हा दिसून आले. मंगळवारी दिवसभर साप्ताहिक डागडुजीनिमित्त वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. संध्याकाळी ६ वा. वीजपुरवठा सुरळीत झाल्यावर काही मिनिटांतच वीजपुरवठा पुन्हा खंडित झाला तो मध्यरात्रीपर्यंत खंडित होता. रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण खोपोली शहर अंधारात होते. एकीकडे वीज नाही, तर दुसरीकडे भयंकर उन्हाळा यामुळे नागरिक हैराण झाले होते.

वीजवितरणच्या या अनागोंदी कारभारामुळे नागरिक हैराण असून यंत्रणेत सुधारणा कधी आणणार? याची प्रतीक्षा शहरातील सर्व वीज ग्राहकांना आहे. मंगळवारी संध्याकाळी हायको कंपनीमागील मुख्य वीजपुरवठा तार तुटल्याने हा वीजपुरवठा खंडित झाला असल्याचे वीज वितरणकडून सांगण्यात आले. दुसरीकडे नियमितपणे साप्ताहिक वीजपुरवठा खंडित करून डागडुजी केली जात असताना वारंवार विजेच्या तारा तुटण्याचा प्रकार का होत आहे? याचा जाब वीज वितरणकडून मिळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

# लाठी खेळात अलिबागकरांचा डंका

## दक्षिण आशियाई स्पर्धेत जिंकली ३१ पदके

**अलिबाग : प्रतिनिधी**

गोवा येथे झालेल्या दुसऱ्या दक्षिण आशियाई लाठी स्पर्धेत अलिबागच्या खेळाडूंनी विविध प्रकारात देशासाठी १४ सुवर्ण, ११ रौप्य व सहा कांस्य अशी एकूण ३१ पदकांची कमाई केली.

दुसरी दक्षिण आशियाई लाठी स्पर्धा गोवा येथे झाली. यात एकम लाठी प्रकारात रूद्रा विनय पिळणकर, मल्हार संदेश गुंजाळ यांनी सुवर्ण; द्विलाठी प्रकारात मंथन वैभव कदम, आयुष मगर यांनी सुवर्णपदक जिंकले. पंचम लाठी प्रकारात शिवम संदेश गुंजाळ, देवदत्त मनीष पडवळ, हार्दिक अकोलकर, वेद वैभव कदम, मल्हार संदेश गुंजाळ यांनी, सई उदय ठाकूर, रुद्रा पिळणकर, आराध्या पंडित नखाते, आराध्या अभिनव मगर, आराध्या प्रथमेश वर्तक यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले. रूद्रा विनय पिळणकर हिने द्विलाठी व द्वि अनिका प्रकारात दोन रौप्यपदकांची कमाई केली. सई उदय ठाकूर हिने एकम लाठी व द्वि अनिका प्रकारात रौप्य, तर आराध्या नखाते व आराध्या मगर यांनी



द्वि अनिका प्रकारात रौप्यपदक मिळवले.

प्रियेश प्रचित मसाल याने द्विलाठी प्रकारात रौप्य, देवदत्त मनीष पडवळ याने एकम लाठी प्रकारात रौप्य, वेद कदम याने काटपवित्रा प्रकारात रौप्य, स्नेहा प्रचित मसाल व ऋग्वेद विकास नाईक यांनी एकम लाठी प्रकारात कांस्य, आराध्या नखाते हिने काटपवित्रा प्रकारात कांस्य, तर मल्हार संदेश गुंजाळ व ऋग्वेद विकास नाईक यांनी द्वि अनिका प्रकारात कांस्यपदक मिळवले.

या सर्व खेळाडूना प्रियंका संदेश गुंजाळ, शुभम महेंद्र नखाते, वेदांत संदेश सुर्वे, सिद्धार्थ पाटील, सिद्धेश सत्विडकर यांचे मार्गदर्शन लाभले. लाठी असोसिएशन अलिबाग रायगडचे अध्यक्ष प्रमोद बाळकृष्ण मसाल यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

# धवल कुलकर्णीची मुंबई संघात पुन्हा एन्ट्री

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी रणजी हंगामासाठी मुंबई संघाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. गेल्या मोसमातील विजेते आणि विक्रमी ४२ वेळा रणजी करंडकावर आपले नाव कोरणाऱ्या मुंबई संघाचा वेगवान गोलंदाज धवल कुलकर्णीने निवृत्ती जाहीर केली होती, पण आता निवृत्तीनंतर पुन्हा कुलकर्णी मुंबईच्या ताफ्यात दाखल झाला आहे.

मुंबई संघाने आगामी २०२४-२५ हंगामातील सर्व फॉरमॅटमध्ये अनुभवी खेळाडू आणि माजी वेगवान गोलंदाज धवल कुलकर्णीला मार्गदर्शक म्हणून नेमले आहे. त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याचा अनुभव असला तरी देशांतर्गत क्रिकेटमधील महान खेळाडूंत त्याची गणना होते. गेल्या रणजी मोसमात मुंबईला विजय मिळवून देण्यात धवलने महत्त्वाची



### मार्गदर्शक म्हणून नियुक्ती

भूमिका बजावली होती.

गेल्या चार रणजी हंगामांवर नजर टाकली तर धवल कुलकर्णीने मुंबई संघाच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करण्याची जबाबदारी घेतली होती. कुलकर्णीचे योगदान लक्षात घेऊन मुंबई क्रिकेट असोसिएशनने त्याला संघाच्या मार्गदर्शकाची जबाबदारी देण्याचा निर्णय घेतला. गेल्या रणजी मोसमात मुंबई संघाला ४२व्यांदा विजय मिळवून देत कुलकर्णीने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली होती.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघाकडून खेळणाऱ्या धवल कुलकर्णीच्या क्रिकेट कारकिर्दीवर नजर टाकली, तर त्याने आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमध्ये भारतीय संघासाठी १२ एकदिवसीय आणि दोन टी-२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने १९ आणि तीन विकेट्स घेतल्या आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये धवलने ९६ सामने खेळताना २७.१च्या सरासरीने २८५ विकेट घेतले आहेत. लिस्ट-ए फॉरमॅटमध्ये १३० सामने खेळताना त्याने २२.१३च्या सरासरीने २२३ विकेट्स घेतल्या आहेत, तर टी-२० फॉरमॅटमध्ये धवल कुलकर्णीने १६२ सामने खेळले असून त्यात त्याने २७.९९च्या सरासरीने १५४ विकेट्स घेतल्या आहेत. तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्सशिवाय पुणे वॉरियर्सकडूनही खेळला आहे.

# आयसीसीच्या निर्देशानुसार युगांडा संघाने बदलली जर्सी




**टी-२० वर्ल्डकप**

**कंपाला : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. सर्वच संघ वर्ल्डकपच्या तयारीत व्यस्त आहेत. आयसीसीच्या या मोठ्या इव्हेंटसाठी प्रत्येक संघाने आपल्या जर्सीचेही अनावरण केले आहे, पण जर्सीच्या बाबतीत युगांडा संघाला थोडे बदल करण्यास सांगण्यात आले. या संघाने आपल्या खेळाडूंसाठी नवीन जर्सी लाँच केली आहे.

२ जूनपासून आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धा सुरू होत असली तरी त्यासाठीचे सराव सामने सुरू झाले आहेत. तत्पूर्वी युगांडाने विश्वचषकासाठी लाँच केलेल्या जर्सीमध्ये आयसीसीने बदल करण्यास सांगितले. युगांडाच्या जर्सीचा रंग पिवळा असून त्याच्या बाहुंवर पक्ष्यांच्या पिसाची डिझाईन होती. त्यामुळे प्रायोजक लोगो नीट दिसत नव्हता. यावरून आयसीसीने जर्सी बदलण्याचे आदेश युगांडा संघाला दिले. त्यानुसार संघाने त्याची नवी जर्सी लाँच केली आहे.

आता युगांडाने बनवलेल्या नव्या जर्सीमध्ये हातावरील पिसे काढण्यात आली आहेत. या नवीन जर्सीमध्ये पँटवर पिसांचे डिझाईन बनवण्यात आले आहे. जुन्या जर्सीच्या तुलनेत २० टक्के बदल करून नवीन जर्सी तयार करण्यात आल्याचे युगांडा क्रिकेट बोर्डाने सांगितले. युगांडाचा संघ वेस्ट इंडिजसाठी रवाना झाल्यानंतर नवीन जर्सचे फोटो शेअर करण्यात आले.

युगांडाचा संघ पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकामध्ये खेळणार आहे. ३ जूनपासून संघ आपल्या वर्ल्डकप मोहिमेला अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्याने सुरुवात करणार आहे. युगांडा संघाचा पहिला सामना गयाना येथे होणार आहे.

# प्रज्ञानंदचा जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनवर विजय

**स्टॅव्हॅन्गर : वृत्तसंस्था**

भारताचा १८ वर्षीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदने स्टॅव्हॅन्गर येथील नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत मोठा विजय नोंदवला आहे. या स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत



आर प्रज्ञानंदने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या मॅग्नस कार्लसनचा पराभव केला आणि या दिग्गज खेळाडूवर पहिला क्लासिकल विजय नोंदवला. गतवर्षी झालेल्या फिडे विश्वचषकात उपविजेता ठरलेला प्रज्ञानंद हा क्लासिकल बुद्धिबळात कार्लसनला पराभूत करणारा चौथा भारतीय खेळाडू आहे.

या विजयासह प्रज्ञानंद तिसऱ्या फेरीअखेर नऊपैकी ५.५ गुणांसह नॉर्वे बुद्धिबळ २०२४ स्पर्धेत आघाडीवर आहे, तर झालेल्या पराभवामुळे मॅग्नस कार्लसनची स्पर्धेत पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे. १८ वर्षीय प्रज्ञानंदने जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनला त्याच्याच देशात पराभूत केले आहे. पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना प्रज्ञानंझने गेल्या वर्षीच्या फिडे विश्वचषक विजेत्या कार्लसनचा निकराच्या लढतीत पराभव केला. यासह भारतीय ग्रँडमास्टरने स्पर्धेच्या खुल्या विभागात आघाडी मिळवली आहे.

# मुंबईकर हरमित सिंग अमेरिकेकडून विश्वचषक स्पर्धा खेळण्यासाठी सज्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकर हरमित सिंगची टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी अमेरिकेच्या राष्ट्रीय संघात निवड झाली आहे. भारतीय खेळाडू ते वर्ल्डकपसाठी एखाद्या देशाच्या राष्ट्रीय संघात स्थानमिळेपर्यंतचा हरमीतचा प्रवास हा चढउतारांचा राहिला आहे.

भारताचा १९ वर्षांखालील माजी क्रिकेटपटू गेल्या एका वर्षापासून अमेरिकेत राहत असून क्रिकेट खेळणे आणि प्रशिक्षण देणे यासह अनेक विविध नोकऱ्या करीत आपले जीवन जगत होता. अखेरीस तो दिवस आता आला. एकेकाळी ऑस्ट्रेलियन दिग्गज इयान चॅपेल यांनी कौतुक केलेला हरमीत आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणार आहे, परंतु यात मोठा फरक आहे तो म्हणजे, टी-२० विश्वचषक स्पर्धेत हरमीत भारताविरुद्ध त्याचा नवीन देश अमेरिकेकडून खेळणार आहे.

खरेतर वादात अडकल्याने ३१ वर्षीय डावखुऱ्या फिरकीपटू हरमीतचे भारताकडून खेळण्याचे स्वप्न भंगले होते. २०१३मधील कुप्रसिद्ध स्पॉट फिक्सिंग प्रकरणामध्ये त्याचे नाव




ओढले गेले, त्या वेळेस तो राजस्थान रॉयल्सचे प्रतिनिधित्व करीत होता. मुंबईतील अंधेरी स्टेशनवर हरमीत गाडी चालवत असतानाच त्याला पोलिसांनी घेरल्याचा हा फोटो व्हायरल झाला. एक प्रतिभावान मुलगा आता भारतीय क्रिकेटचा नकोसा तरुण खेळाडू बनला होता. संघातील सहकारी आणि मित्रही त्याच्यापासून लांब राहू लागले. कार प्रकरणापेक्षा अधिक चर्चा फिक्सिंग प्रकरणाची झाली होती.

२०२०च्या सुरुवातीस हरमीतला अमेरिकेमधून कॉल आला की त्याला भविष्यात मेजर क्रिकेट लीगमध्ये खेळण्याची इच्छा आहे का? अमेरिका क्रिकेट बोर्ड मेजर लीग क्रिकेटमध्ये खेळू शकतील अशा व्यावसायिक क्रिकेटपटूंच्या शोधात होते. सिएटलला जाण्यापूर्वी तो अटलांटामध्ये चार महिने राहिला. क्रिकेट खेळून त्याने अर्धवेळ कोचिंगही केले. २०२१मध्ये त्याला अमेरिकेने तीन वर्षांचा करार केला आणि हरमीतने भारतातील खेळाच्या सर्व फॉरमॅटमधू निवृत्ती घेतली. नियमानुसार, जर तो अमेरिकेमध्ये सलग ३० महिने राहिला, तर तो अमेरिकेच्या राष्ट्रीय संघाकडून खेळण्यास पात्र ठरेल आणि मार्च २०२३पर्यंत तो अमेरिका संघाकडून खेळण्यास पात्र ठरला.

### रोहित शर्माचा शालेय मित्र

अमेरिकेमध्ये खेळणाऱ्या बहुतांश भारतीय खेळाडूंच्या नजरा १२ जूनला होणाऱ्या सामन्यावर लागल्या आहेत, कारण १२ जूनला विश्वचषक लीग सामन्यात अमेरिकेचा संघ भारताविरुद्ध खेळताना दिसणार आहे. या सामन्यात हरमीत त्याच्या शालेय मित्राविरुद्ध म्हणजेच रोहित शर्माविरुद्ध खेळताना दिसणार आहे. हरमीत व रोहित शर्मा बोरिवली येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल शाळेत एकत्र शिकले होते. हरमीतला या सामन्यासाठीच्या तिकिटांसाठी अनेक विनंत्या येत होत्या, पण तो किती जणांची ही इच्छा पूर्ण करेल याचा त्यालाही अंदाज नाही, असेही हरमीतने सांगितले.

# खेळात करिअर घडवायचे असेल, तर स्मार्ट फोन वापरणे टाळा -दिनेश लाड

**मुंबई : प्रतिनिधी**

खेळात करिअर घडवायचे असेल, तर स्मार्ट फोन वापरणे टाळले पाहिजे, तरच तुम्ही तुमचे ध्येय निश्चित गाठू शकता, असा सल्ला द्रोणाचार्य पुरस्कार विजेते क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांनी सुनीता देवधरकर-कळंबे षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळयात दिला. लाड व सदानंद शेट्ये यांच्या हस्ते सुनीता हिचा सन्मान करण्यात आला.

'संपर्ककरिता फक्त साधा फोन वापरण्यास हरकत नाही. मी प्रशिक्षक असताना मुंबई क्रिकेट संघासाठी



हा प्रयोग केला. त्याचा फायदा झाला, असे पुढे लाड म्हणाले. महर्षी दयानंद स्पोर्ट्स क्लबने महर्षी दयानंद महाविद्यालयात या सोहळ्याचे आयोजन केले होते. गौरवमूर्ती देवधरकर यांनी आपल्या भाषणात उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले. यानिमित्ताने महर्षी दयानंद महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रमाकांत मोरे यांचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

# 'त्या' पोस्टमुळे रितिकासह रोहित शर्मा सोशल मीडियावर ट्रोल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेहला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोल केले जात आहे. एक्सवर तर रितिकासह रोहितलाही ट्रोल केले जात आहे आणि यामागचे कारण म्हणजे रितिकाची इन्स्टाग्राम स्टोरी. तिने 'ऑल आइज ऑन रफा'च्या समर्थनार्थ पोस्ट केली आहे.

सोशल मीडियावर रफा हा शब्द ट्रेंड करीत आहे. हा फोटो इस्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाशी निगडित आहे. गाझाच्या दक्षिण भागात वसलेल्या रफा शहरात इस्रायलने हल्ला केल्यानंतर जगभरात निषेधाचे सूर उमटत आहेत. इस्रायलने अलीकडेच पॅलेस्टिनी विस्थापितांनी उभ्या केलेल्या शरणार्थी छावणीवर हल्ला केला आहे. या हल्ल्यात मोठ्या संख्येने निष्पाप लोक मारले गेले असून अनेक लोक जखमीही झाले आहेत.

रफामधील या घटनेनंतर रितिकाने एक इन्स्टा स्टोरीदेखील पोस्ट केली होती, पण आता खूप ट्रोल झाल्यानंतर तिने तिची इन्स्टा स्टोरी डिलीट केली आहे.

# भारत-पाकिस्तान सामन्यात दहशतवादी हल्ल्याची धमकी

**न्यूयॉर्क** : अमेरिकेत पहिल्यांदाच होत असलेल्या टी-२० विश्वचषकातील भारत आणि पाकिस्तान सामन्यासाठी सगळेच उत्सुक आहेत, पण या दरम्यान आयएसआयएस-के दहशतवादी संघटनेकडून संपूर्ण जगाचे लक्ष असलेल्या सामन्यावर हल्ल्याची माहिती समोर येताच न्यूयॉर्कच्या आयझेनहॉवर पार्क स्टेडियमवर सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

आयएसआयएस-के गटाने धमकीचा व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये त्यांनी आपल्या हल्लेखोरांना भारत-पाकिस्तान सामन्यावर 'लोन वुल्फ' हल्ला करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर स्थानिक पोलीस प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. स्टेडियमच्या वर एक ड्रोन उडताना दाखवला असून त्यावर ९/०६/२०२४ ही तारीख देण्यात आली आहे. त्या व्हिडीओमध्ये कोणत्याही ठिकाणाचे नाव दिले नाही, पण जी तारीख नमूद करण्यात आली आहे, त्याच दिवशी भारत-पाकिस्तान सामना आहे.

# अल्टिमेट टेबल टेनिस यंदा नव्या, आकर्षक रूपात

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारताची प्रमुख टेबल टेनिस लीग अर्थातच अल्टिमेट टेबल टेनिस ही २२ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत चेन्नईतील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. अव्वल दर्जाच्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आकर्षित करणारी आणि भारतीय पॅडलर्सच्या जलद प्रगतीच्या क्षमतेसाठी ओळखली जाणारी ही लीग आणखी एका रोमांचक नवीन हंगामासाठी सज्ज झाली आहे.

भारतीय टेबल टेनिस फेडरेशनच्या विद्यमाने निरज बजाज आणि विटा दाणी यांनी प्रोत्साहन दिलेली फ्रँचायझी लीग २०१७मध्ये स्थापन झाल्यापासून भारतीय टेबल टेनिससाठी एक गेमचेंजर ठरली आहे. या स्पर्धेत यंदा प्रथमच आठ संघांचा समावेश असणार आहे, जी युवा भारतीय पॅडलर्सना जगातील अव्वल खेळाडूंसोबत त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करेल. स्पर्धेचा दर्जा वाढवणे आणि खेळातील उदयोन्मुख प्रतिभेच्या वाढीला चालना देणे हा या महत्त्वपूर्ण विस्ताराचा उद्देश आहे.

टेबल टेनिसच्या वाढत्या लोकप्रियतेने, उल्लेखनीय भारतीय




कामगिरीमुळे लीगचा विस्तार नवीन प्रदेशांमध्ये झाला आहे. त्यामुळेच अहमदाबाद एसजी पायपर्स आणि जयपूर पॅट्रियट्स या दोन प्रतिष्ठित फ्रँचायझींचा समावेश करण्याची अभिमानाने घोषणा ही लीग करते. लीगच्या नव्या आवृत्तीसह सुरू होणारा हा एक आनंददायक नवीन टप्पा आहे.

आठ संघांच्या समावेशासह स्वरूपात थोडासा बदल करण्यात आला आहे, जे आता प्रत्येकी चार संघांच्या दोन गटांमध्ये विभागले जातील तसेच प्रत्येक फ्रँचायझी लीग टप्प्यात पाच टायमध्ये स्पर्धा करतील. त्यांना संबंधित गटातील इतर सर्व संघांचा एकदा सामना करावा लागेल व विरोधी गटातील यादृच्छिकपणे निवडलेल्या दोन संघांसह ते खेळतील. हे दोन संघ ड्रॉद्वारे निर्धारित केले जाईल.

### दहा संघांचा समावेश

गोवा चॅलेंजर्सने मागील वर्षी माजी विजेत्या चेन्नई लायन्सवर विजय मिळवला आणि यंदाच्या लीगसाठी गतविजेते म्हणून लीगमध्ये प्रवेश केला. दबंग दिल्ली टीटीसी, यू मुंबा टीटी, पुणेरी पलटण, बंगळुरू स्मॅशर्स आणि दोन नवीन फ्रँचायझी यांचा यंदाच्या पर्वात समावेश आहे. प्रत्येक संघ दोन परदेशी खेळाडूंसह सहा खेळाडूंचा रोस्टर राखेल, कारण ते सर्व या हंगामात प्रतिष्ठित विजेतेपदासाठी लढत आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com